ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

ऑगस्ट २०११ मूल्य १० रुपये




## ‘ध्येयस्विनी’ साधनाताई आमटे

प्रा. श्रीकांत पाटील

## वादाचं तेल वांग्यावर

डॉ. उज्ज्वला दळवी

## आदिवासी अस्मितेचा हुंकार : डॉ. विनायक तुमराम

मदन धनकर


‘ही आपलीच माणसं’ या गजानन सबनीस यांच्या पुस्तकाचे इंग्रजी रूपांतर नुकतेच अमेरिकेत प्रसिद्ध झाले त्यावेळी त्याच्या मराठी आवृत्तीचे अमेरिकन साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत आयपॅडवर प्रकाशन झाले तो हा आगळा क्षण.



**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**ऑगस्ट २०११, वर्ष ३१ वे,**
**अंक आठवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

उग्र तपस्व्याची स्नेहल सावली झालेल्या साधनाताई आमटे यांचं गेल्या महिन्यात निधन झालं. 'आनंदवन'नामक सृष्टीनिर्मात्याच्या सृजनतेची शक्ती होताना वंचितांवर मातृत्वाची पखरण करणारी लोकमाता आपलं जीवितकार्य संपवून देहत्याग करती झाली तो दिवस बाबा गेले तो शनिवार असावा, तारीख ९ असावी आणि वेळही साधारण तीच असावी हा एक विलक्षण योगायोग आहे. त्यांच्या जीवनाचं, 'ज्वाला आणि फुले' यांचं अनोखं अद्वैत प्रा. श्रीकांत पाटील यांनी या अंकात मांडलंय. ते वाचताना आपण अंतर्मुख होतो, नतमस्तक होतो.

ज्या वरोड्यात आनंदवन उभं राहिलं तो चंद्रपूर आणि पुढचा गडचिरोली हे सीमावर्ती आदिवासी भाग. या आदिवासींचे हुंकार टिपले डॉ. विनायक तुमराम यांनी. अनुसूचित जमातींच्या विविध धारणांना समजून त्यांना विकासाकडे नेलं पाहिजे अशा भूमिकेतून त्यांनी विविध प्रकारचं लेखन केलं. आदिवासी संमेलनं भरवली. त्यांच्या समर्पित जीवनाची दखल मदन धनकर यांच्या लेखातून वाचायला मिळेल.

डॉ. उज्ज्वला दळवी यांच्या लेखमालेतून उलगडणारा मानवी जनुकांच्या अभ्यासाचा आलेख आणि त्याचे परिणाम याची सुबोध शैलीतील मांडणी वाचकांची जिज्ञासा शमवत आहे.

एकीकडे विज्ञानाची प्रगती थक्क करणारी दिसते, त्याचवेळी तंत्रज्ञानाच्या धावपळीने माणसाला थकवलेले जाणवते. असे असले तरी माणूस आणि तंत्र व शास्त्र यांचा मेळ कसा वाढेल आणि तो तळापर्यंत झिरपेल यासाठी सकारात्मक विचारांचे अभिसरण व्हायला हवे.

ग्रंथालीने १९८० साली घेतलेल्या वाचन परिषदेत, येऊ घातलेल्या संगणकयुगाचे स्वागत केले होते. आता अमेरिकेत झालेल्या शिकागो येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात 'ग्रंथाली'च्या तीनशे पुस्तकांचे इ–बुक स्वरूपात आयपॅड आणि संगणकावर प्रकाशन करून पुढचे पाऊल टाकले आहे.

**– संपादक**

# ‘ध्येयस्विनी’ साधनाताई आमटे

**प्रा. श्रीकांत पाटील**

श्रद्धेय साधनाताई आमटे यांनी ९ जुलैला शनिवारी अखेरचा श्वास घेतला. आनंदवन परिवारातील सर्व त्यांचा उल्लेख श्रद्धेय ताई असाच करतात. त्यांच्या मृत्यूने एका समर्पणशील साधनेची सांगता झाली. कृष्ठरोगी, अंध-अपंग, अनाथ या साऱ्यांच्या सेवेत कणकण झिजणाऱ्या एका समिधेचे अखेरचे पर्व संपले. ताईंच्या रूपात वावरणारे, आनंदवनातील मूर्तिमंत वात्सल्य अखेर धरित्रीच्या कुशीत कायमचे विसावले. ज्या महाकवीने अभयारण्याचे आनंदवन घडवले, त्या श्रद्धेय बाबा आमटे यांच्या कार्यात ध्येयस्विनी झालेल्या ताईंच्या पार्थिवाची अखेरची ‘समिधा’ श्रद्धावनात समर्पित झाली; बाबांच्या स्मृतींसोबत एकरूप झाली.

ताईंना जाऊन आता पंधरवडा लोटला. माझ्या बालवयापासून पुढल्या पन्नास वर्षापर्यंतची ताईंची विविध रूपे आज मनात रुंजी घालताहेत. आपल्या लहान मुलांसोबत वरोड्यालगतच्या जंगलात आणि आजच्या आनंदवनात बाबांच्या सोबत अनोखा संसार मांडणाऱ्या ताई, ‘धरतीची गादी, पाषाणाची उशी’ करत, ऊन-वारा अंगावर घेत, कुष्ठरोग्यांसाठी स्वतः स्वयंपाक करणाऱ्या ताई, बांबूच्या काड्यांचा आडोसा करून स्नानासाठी बसताना, पहिला भरलेला लोटा अंगावर घेताच पायाखालच्या वारूळातून भराभर चढलेल्या विंचवाना सोसणाऱ्या ताई, आनंदवनातील कुष्ठरोग्यासाठी सकाळ-संध्याकाळ गाईंची धार स्वतः काढणाऱ्या



ताई, बाबांना सर्पदंश झाला तेव्हा रात्रभर वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालणाऱ्या ताई, कुष्ठरोग झालेल्या आईचे दूध तिच्या मुलाला पाजायचे नाही असे डॉक्टरांनी सांगितल्यावर त्या लेकरांना घरी येऊन त्यांच्यासाठी आयुष्यभर माऊली झालेल्या ताई, बाबा असोत की आनंदवन, यावर कोसळलेल्या संकटाला न जुमानता अतिशय कणखरपणे निर्णय घेणाऱ्या ताई, भारत जोडो अभियान असो की नर्मदा बचाव अभियान असो, या प्रदीर्घ, वर्षानुवर्षे चाललेल्या आंदोलनात, एकाकी विजनवासात, बाबा आमटे यांची सावली झालेल्या ताई, आणि आयुष्याच्या उत्तरायणात कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाने ठाण मांडल्याची चाहूल लागल्यावर तितक्याच निश्चयाने, तितक्याच समाधानाने, तितक्याच आनंदाने स्वतःला मृत्यूच्या स्वाधीन करणाऱ्या ताई... अशी ताईंची असंख्य रूपे आज पुन्हा पुन्हा आठवताहेत.

साधनाताईंचा मृत्यू तसा अनपेक्षित नव्हता. दोन महिन्यांपासून ताई स्वतःच आपल्या अंतिम प्रवासाची तयारी करत होत्या. मे महिन्याच्या पूर्वार्धात त्या नागपूरच्या दवाखान्यातून उपचार घेऊन परत आल्या होत्या. आपले शरीर आता हळूहळू क्षीण होत चालले हे त्यांना जाणवत होते. आपल्यासाठी कुणी त्रास सहन करावा, कष्ट घ्यावे ही कल्पनाच त्यांना सहन होणारी नव्हती. अंतःकरणात ओसंडून वाहणारी जीवन जगण्याची तृप्ती पूर्वीसारखीच चेहऱ्यावर उमटत होती; निर्व्याज स्मिता-सारखी. यशोधरेच्या स्मितासारखे हे कृतकृत्यतेचे स्मित होते. चेहऱ्यावर पूर्वीसारखीच सात्त्विक प्रसन्नता होती. उदासीनतेचा कुठे लवलेशही नव्हता. उपवास हा त्यांच्या व्रतस्थ जीवनाचा एक अविभाज्य भाग होता. बाबांच्या आरोग्यासाठी त्यांनी कितीतरी उपवास केले होते. या व्रतस्थ जीवनाची सांगताही ताईंनी उपवासानेच केली. प्रारंभी अन्नाचा त्याग, नंतर पाणीसुद्धा घ्यायचे नाही. एका अर्थाने तो प्रायोपवेशच होता.

ताईंचे अस्तित्व बाबा आमटे यांच्याशिवाय वेगळे काढून दाखवता येत नाही; आणि बाबांचे कार्य ताईंच्या सेवेशिवाय भिन्न करता येत नाही. श्रद्धेय ताई ही बाबांच्या सर्व कार्याची प्रेरणा होती आणि बाबांवरील प्रेम ही ताईच्या सेवाकार्यातील शक्ती होती. ताईंनी स्वतःला बाबांपासून, त्यांच्या कार्यापासून वेगळे मानलेच नाही.

विवाहानंतर त्या आमटे कुटुंबात आल्या तेव्हापासून, बाबांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची सावली म्हणून त्यांनी स्वतःच्या आयुष्याची लय पक्की करून टाकली होती. वास्तविक ताईंचे जन्मकूळ हे वैदिक घराण्यातील. नागपूरच्या घुलेशास्त्र्यांच्या घराण्यात वैदिक मंत्रोच्चारांनी भारलेली आणि अभिमंत्रित झालेली, विशिष्ट प्रकारची साधनशुचिता होती. या वैदिक परंपरेतील घरात जगण्याचीही एक वेगळी मूस असते. या मुशीतच ताईंच्या संस्काराची जडणघडण झालेली होती. पण, बाबा आमटे ह्यांच्याशी विवाह झाल्यानंतर जन्मकुळातील संस्काराच्या सर्व संकल्पना पूर्णपणे बदलल्या. एका कलंदर, निःसंग, बुद्धिमान, त्यागी, दूरदृष्टी असलेल्या कर्मयोग्याची सहचारिणी म्हणून त्यांनी बाबांसोबत आयुष्याची वाटचाल सुरू केली; त्यामुळे अतिशय आनंदाने इंदुताईंनी स्वतःला साधनाताईंत रूपांतरित केले होते.

बाबा आमटे आणि ताई यांच्या प्रपंचाचा प्रवासच मुळी निर्जन अरण्यातून होतो. विवाह झाल्यानंतर हे दोघे वरोड्यात आले आणि वरोड्याच्या गावकुसाबाहेरच्या शेतात त्यांनी 'श्रमाश्रमा'च्या अभिनव प्रयोगाला सुरुवात केली. ताईंच्या शब्दात सांगायचे झाले तर ते 'कष्टायन' होते. गावकुसाबाहेर राहणाऱ्या सगळ्या कुटुंबांनी जात, पात, धर्म सोडून एकत्र राहायचे; एकत्र काम करायचे. एकच कुटुंब म्हणून जगायचे. बाबा आणि ताईंनी सर्वांचे पालकत्व स्वीकारलेले. जात्यावर बसून ताईंनी दळणकांडण करावे, गाईचे दूध काढावे, छोट्याशा शेतीत भाजीपाला काढावा. या श्रमाश्रम परिवारातील बायकांकडून ताईंनी झाडू तयार करायला शिकावे, टोपल्या करण्याचे कौशल्य शिकावे, फडे, केरसुण्या तयार कराव्या. अशा दिनचर्येत ताई गुंतून जात. यासोबतच, वेळोवेळी, बाबांना भेटण्याकरता, त्यांच्याशी विचारविनिमय करण्याकरता बाहेरगावचे पाहुणे येत. त्यांचे आगतस्वागत ताईंकडेच असे. हा व्याप हळूहळू वाढू लागला. श्रमाश्रमाची व्याप्ती आता कुष्ठरोग्यांच्या सेवेत परिवर्तित झाली; आणि ताई-बाबांचा मुक्काम वरोड्याच्या बाहेर तीन किलोमीटर अंतरावरील साडेचारशे एकराच्या घनदाट जंगलातील झोपडीत हलला. ताईंच्या शब्दात सांगायचे तर ते 'अभावारण्य' होते. एकीकडे घनदाट अरण्य, श्वापदांचे कानावर येणारे आवाज, पायाखाली काटे, सोबत अंध, अपंग आणि कुष्ठरोगी. त्यातही, संसाराच्या वेलीवर उमलेली दोन चिमुकली फुले, या सर्वांचा मिळून एक अनोखा संसार ताईंनी मांडला. या जंगलात वास्तव्याला असताना मुलांची प्रकृती बिघडली तर दवाखान्याची सोय नाही, जवळ औषधाचे दुकान नाही, रोगाचे निदान करायला डॉक्टर नाही, साप, विंचू, इंगळी यापैकी कुणाचा दंश झाला तर वेळेवर धावपळ करायला वाहन नाही. मुले सहा-सात वर्षांची झाली तरी तीन किलोमीटरच्या आत शिकण्यासाठी शाळा नाही. जवळपास शेत नाही, पिण्याचे पुरेसे पाणी नाही. पण या अभावाला आव्हान देत श्रद्धेय बाबांसारख्या अभयसाधकाचे तुडुंब प्रेम, या एका ठेवीवर हे जोडपे यशाकडे वाटचाल करत राहिले.

बाबा आणि ताई यांचा प्रपंच हे विसाव्या शतकातील आगळेवेगळे शिवशक्तीसमान्वेषण आहे. शिवशक्तीच्या आदीम रूपाचे आकलन व्हायचे असेल तर शिवाचे स्वतंत्रपणे आणि शक्तीचेही स्वतंत्रपणे आकलन होत नाही. विश्वातील सर्व व्यापार, त्यातील परिवर्तन, काळाचा प्रवास, हे सर्व व्यापार शक्तीच करत असते; पण शक्तीच्या या कार्याला शिवाच्या साहचर्याची अट असावी लागते. भारतीय आध्यात्मिक संकल्पनेतील या शिवशक्तीसमान्वेषणाची प्रचिती वर्तमानकाळात बाबा आणि ताई यांच्या एकात्म सेवाकार्यातून घडते. बाबांनी कोणतीही जबाबदारी स्वीकारायची आणि ताईंनी ती अजिबात न कुरकरता पार पाडायची. बाबांनी आव्हानांचे 'गोवर्धन' लीलया पेलावे आणि ताईंनी मनोमन बाबांनी उभारलेल्या सर्व प्रकल्पांचे व्यवहारकुशलतेने नियोजन करावे. ताईंसोबत गप्पा कुठल्याही रंगलेल्या असोत, बाबांचा त्याग, त्यांची निर्भयता याविषयी त्या आवर्जून बोलणार, तर बाबांनी केलेले कोणतेही उद्‌बोधन, मग ते आनंदवनातील मित्रमेळाव्यातील असो किंवा राष्ट्रपतीभवनातील गौरव स्वीकारतानाचे असो, त्याचा आरंभ 'सौ. साधना' अशाच नाममुद्रेने व्हायचा. नर्मदा बचाव आंदोलनाच्या वेळी बाबांचा व ताईंचा मुक्काम नर्मदेच्या तीरावर उभारलेल्या झोपडीत होता. बाजूला नर्मदेच्या काठावर शिवाचे पुरातन दगडी बांधणीचे मंदिर होते. ताईंचा दिवसाचा आरंभ पहाटप्रहरी शिवालयातील पूजेने व्हायचा. बाबांना देवळातला देव मान्य नव्हता. त्यांना त्यांच्या 'प्रभूचे हजार हात' शापितांमध्ये आणि वंचितामध्ये दिसायचे; पण त्यांची श्रद्धा शिवापेक्षाही ताईंवर अधिक होती. ताई तिथे देवळात पोचण्याच्यापूर्वीच बाबा त्या शिवालयात पोचत, ताईंच्या पूजेसाठी फुले आणून देत. देऊळ स्वतः पूर्ण स्वच्छ करत आणि ताईंनी शंकराची आरती म्हणायला सुरुवात केली की बाबा देवळाच्या बाहेर उभे राहून सभामंडपातील घंटा वाजवत असत. कुणी विचारले तर ते सांगत, 'मला पूर्वीही देवखुळ नव्हते, आताही नाही. मी ताईचा गुरव आहे, शिवाचा नाही.'

बाबांचे पहिले चिंतनकाव्य 'ज्वाला आणि फुले' या नावाने प्रकाशित झाले होते. बाबांच्या आणि ताईंच्या एकात्म व्यक्तित्त्वाचे वर्णनही ज्वाला आणि फुले असेच करता येईल. बाबांसोबत ताईंचा संसार म्हणजे ज्वालेशीच संसार होता. नियमांचे, कर्तव्याचे, वेळेचे कठोर पालन करायचे, त्यात कुठेही तडजोड करायची नाही. संस्थेच्या कारभारात कुणाकडून कर्तव्यात कसूर झाल्यास त्याची गय नव्हती, या कर्तव्यकठोरतेत कुणीही जवळचा आणि दूरचा असा भेद नव्हता. एखाद्या कामात सहभागी व्हायचे ठरले की बाबा संपूर्ण निष्ठेने

त्या कार्यात स्वतःला झोकून देत. यात कोणतेही कारण; अडचण पुढे येत नसे, स्वतःच्या तब्येतीची तमाही ते बाळगत नसत. बाबांचे व्यक्तित्त्व एखाद्या वादळासारखे होते. या झपाटलेल्या वादळा-मुळे आनंदवनातील कार्यकर्त्यांच्या रूपाने तेवलेले स्नेहदीप विझू न देण्याची काळजी ताईंनी घ्यायची. या झंझावाताचे ओरखडे कधी कुणावर उठतच नव्हते असे नाही. या ओरखड्यांवर फुंकर घालण्याचे काम ताईंकडे असे. ताईंच्या वात्सल्याची किमयाच अशी होती की, हे 'तुफानातले दिवे' पुन्हा नव्या स्नेहाने, नव्या उमेदीने कामाला लागत.

मला आठवते, १९९८ सालची गोष्ट असावी. बाबा-ताईंचा मुक्काम कसरावदला नर्मदेच्या काठी होता. राजहंसांनी लिहिलेल्या बाबांच्या चरित्राचे प्रकाशन होते. तो दिवस आश्विन पौर्णिमेचा. कोजागिरीची रात्र. त्या चांदण्याच्या मंद प्रकाशात ताईंना नर्मदेच्या पाण्यात दिवे सोडायचे होते. ताई नावेत बसल्या. आम्ही तीरावरून हा दीपदानाचा सोहळा बघत होतो. नर्मदेच्या ऐन प्रवाहात ताईंची नाव थांबली. केळीच्या द्रोणात ठेवलेले दिवे एकेक करून तेवले होते. एक लोकमाता लोकगंगेच्या कुशीत एकेक दिवा सोडत होती. काही क्षणातच, या दिव्यांची दीपमाळ झालेली होती. ताईंनी वाढवलेले, घडवलेले असे अनेक कार्यकर्ते ताईंच्या मायेतील रेशीमबंधात गुंफलेले आजही आम्ही पाहतो. त्याच आत्मीयतेने हे सगळे दिवे सेवेचा प्रकाश संपूर्ण जगाला देत आहेत. ताईंच्या अंतःकरणातील वात्सल्याने या सेवेला अनोखा सुगंध लाभला आहे. बाबांच्या व्यक्तित्वात ज्वालेची दाहकता होती, तर ताईंच्या व्यक्तित्वात फुलांतील सौरभ, सुकुमारता, एकवटली होती. ताई मितभाषी होत्या. पण त्यांच्या चिमूटभर बोलण्यातही खूप मार्मिकता असायची, मिश्किल विनोदही असायचे, त्यातही बाबांसोबत त्यांचा संवाद असला की, ही मार्मिकता अधिकच सतेज होत असे. तरुणांसोबत संवाद घडला की बाबांच्या



ओठावर त्यांच्या कवितेच्या ओळी यायच्या-

"I Sought my soul, My Soul I could not see
I Sought my God, My God eluded me
I Sought my friend, I found all the three."

बाबांच्या या ओळी त्यांच्या निवासावरही लावलेल्या होत्या. ताईंनी या ओळींवर आपले भाष्य ठेवले-

"I Sought my lover, My lover I could not see
I Sought my friend, My friend eluded me
I Sought my husband, I found all the three."

ताईंच्या या आस्वादक समीक्षेवर बाबांनीही दाद द्यावी. एकदा बाबांना ताई म्हणाल्या, तुम्ही विनोबांना पत्र लिहिलेय, त्या पत्रात तुम्ही लिहिलेय की, ''तुझ्या प्रवचनातून पावनता अनेक लोक पिऊन जातात, पण तुझ्या शिष्यांच्या नशिबी वंचनेचा चोथाच आला आहे.'' या ओळीवर ताई बाबांना म्हणाल्या, ''तुमच्या बोलण्यातून अनेक लोक प्रेरणा घेऊन जातात. पण तुमच्या साधनेच्या नशिबी कटकटीचा चोथाच आहे. कटकट हिअर, कटकट देअर, कटकट कटकट एव्हरीव्हेअर.'' ताईंची आणि बाबांची अशी मार्मिक जुगलबंदी चालायची आणि मैफल हास्याच्या कल्लोळात हरवून जायची.

ताईंची श्रद्धास्थाने ही कधी-कधी गमतीचा तर कधी कौतुकाचा विषय ठरला आहे. बाबांवर अव्याहत ओढवणारे आघात, मग कधी ते अपघाताचे, आजाराचे तर कधी ऑपरेशनचे, या आघातांनी ताईंची आयुष्यभर सोबत केली. त्यावेळी या श्रद्धेने त्यांना वेळोवेळी मानसिक बळ दिले. श्रद्धा आणि करुणा ही दोन मूल्ये, ताईंनी आमटे कुटुंबीयांत प्रवेश करताना माहेराहून, म्हणजे घुलेशास्त्र्यांच्या घराण्यातून सोबत आणली होती. ईश्वराची सगुण उपासना करणे, त्याच्या पूजेसाठी वेळ काढणे, मंदिर, मग ते कोणतेही असो, तेथे जाऊन नतमस्तक होणे, अशा सगुणदेवतेला संकटाच्या क्षणी साकडे घालणे, त्यासाठी उपासतापास करणे आणि यातून अंतःकरणातील आस्मिक शक्ती जागवणे, या आत्मिक बलाच्या अधिष्ठानावर हातातील सगळी कामे बिनतक्रार करणे हा त्यांच्या जीवनाचा, जीवनशैलीचा स्थायीभाव राहिला. एका अर्थाने, ताईंची श्रद्धा त्यांच्या कार्यातील संजीवन होते, प्राणवायू होता. विज्ञानाच्या भाषेत सांगायचे झाले तर, ती ताईंच्या जीवनातील ऊर्जा होती. ही त्यांची श्रद्धा कधीही एकारली नाही. मंदिर, मशीद, चर्चस या सर्व प्रार्थनामंदिरांपुढे ती सदैव विनम्र राहिली.

याचवर्षी, फेब्रुवारी महिन्यात ठाण्याचे

एक मित्रमंडळ आनंदवनात आले होते. डॉ. विकास आमटे यांनी आनंदवनातील अभयारण्यात त्यानिमित्ताने आनंदवनातील सर्व कार्यकर्त्यांना एकत्र जमवले होते. ताई त्यांच्या आजारपणातही या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्याने ताईंना आशीर्वादपर बोलण्याची विनंती केली. त्यावेळी ताईंनी आनंदवनातील १९५३ मध्ये भरलेल्या श्रमशिबिराची आठवण करून दिली. या श्रमशिबिरात निरनिराळ्या देशांतील विभिन्न धर्मांचे लोक कसे सहभागी झाले होते, आणि प्रत्येक दिवशी येथे सर्वधर्माच्या प्रार्थना कशा होत, हे सांगताना ताईंनी हिंदू, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, इस्लाम, ज्यू या धर्मांच्या प्रार्थना अतिशय सहजतेने, त्या त्या प्रार्थनेच्या शैलीत गाऊन दाखवल्या. वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षातही ताईंच्या गळ्यात गोड स्वराचे कोंदण दडलेले होते.

ताई उत्तम व्यवस्थापक होत्या. काही काळ त्या कुष्ठरोगी सेवा समितीच्या सहसचिवही राहिल्या. या सहसचिवपणात वात्सल्य आधिष्ठित झाले की नियमांपेक्षा आस्थेने आणि आत्मीयतेने कामे सोपवली की माणसे कशी कामाला लागतात याची प्रचिती येत असे. वात्सल्याच्या अधिष्ठानाने कर्मचारीदेखील 'कार्यकर्ता' होऊ शकतो हे त्यांच्या व्यवस्थापनातून जाणवत होते. आनंदवनातील वस्तू वापरली की ताई त्याचा आर्थिक आकार आनंदवनाच्या कार्यालयात जमा करत. आनंदवनाच्या परिसरात जेव्हा एकेक प्रकल्प नव्याने उभे राहू लागले, त्यावेळी अनेक कुटुंबे, अनेक माणसे आनंदवनात वास्तव्याला आली. तसतसे, ताईंचे घरदेखील नव्या प्रकल्पाच्या प्रमाणात विशाल होऊ लागले. या घरात प्रारंभी कुष्ठरोगी होते. हळूहळू त्यात अंध-विकलांग यांनाही स्थान मिळाले. पुढे पुढे तर ज्यांना जन्मतःच आईबापांनी टाकले अशी अनाथ मुले ताईंच्या घराची घटक झाली. तर ज्या आईबापांना मुलांनी टाकले त्या पोरक्या आईबापांना उत्तरायणाची ऊब ताईंनी दिली. ताईंच्या या वात्सल्याचा आठव अशी माणसे आपल्या ओठांवर अभिमानाने मिरवू लागली. कुणाच्या तरी विवाहाच्या क्षणी, आयुष्याच्या नव्या वळणावर पहिले पाऊल टाकणारी आनंदवनातील नववधू उखाणा घेताना '... चे नाव घेते ताई-बाबांची लेक' असे नाव घ्यायची. हे वात्सल्याचे रेशीम आनंदवनाच्या मातीत ताईंमुळे अंकुरले.

१९८२ मध्ये आनंदवनात विदर्भ साहित्य सम्मेलन आयोजित झाले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या संमेलनाचे उद्घाटक होते, तर प्रा. गंगाधर पानतावणे यांनी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले होते. आयोजनाच्या पहिल्या बैठकीत बाबा आमटे, प्राचार्य राम शेवाळकर आणि विदर्भ साहित्य संघाच्या आनंदवन-वरोरा शाखेचा कार्यवाह म्हणून मीही तेव्हा उपस्थित होतो. बाबा म्हणाले, 'कार्यक्रमाच्या आयोजना-संबंधीचे नियोजन साहित्य संघाने ठरवावे. साहित्य संमेलनाची सर्व व्यवस्था आनंदवन करील. आणि त्या भूमिकेतून स्वागताध्यक्ष म्हणून ताईंनी ही जबाबदारी स्वीकारावी'. आम्ही जिथे बसलो होतो, तिथेच कोपऱ्यात आनंदवनाचा फोन ठेवला होता. बाबांनी लगेचच आचार्य दादा धर्माधिकारी यांना फोन लावला. बाबांचे बोलणे सर्वांनाच ऐकू येत होते. बाबा म्हणाले, ''दादा, साहित्यसंमेलन आनंदवनात घ्यायचे ठरले आहे आणि ताई या साहित्यसंमेलनाची स्वागताध्यक्ष राहणार आहे, तिला आशीवार्द द्या.'' आचार्य दादा धर्माधिकारी म्हणाले, ''साहित्य संमेलन तेही श्रमतीर्थावर-आनंदवनात आणि स्वागताध्यक्ष ताई राहणार! मला तिथे यायला आवडले असते, पण वाढत्या वयाने शक्य होईल असे मला वाटत नाही. बाबा, ताईंनी आतापर्यंत आलेल्या सर्व आव्हानांचे आजवर स्वागतच केले आहे, तिथे सर्व सारस्वत-उपासकांचे स्वागत होणार नाही असे कसे होईल! स्वागतासाठी सदैव तत्पर असलेल्या मातृहृदयाला आशीर्वाद देण्याचा अधिकार माझा नाही. जरी मी वयाने मोठा असलो तरी! ताई स्वागताध्यक्ष आहेत हे संमेलनाचे भाग्य समजा''.

साहित्यसंमेलन दोन दिवसांवर आलेले होते. या साहित्यसंमेलनाचा सरचिटणीस म्हणून माझ्यावर जबाबदारी होती. मी बाबांना संमेलनाच्या आयोजनाची माहिती देत होतो. बाबा म्हणाले, ''अरे, स्वागताध्यक्षाचं मनोगत ताईंनी लिहून ठेवलं आहे. तू एकदा ते बघून घे.'' बाबांनी ताईंना बोलावलं. ताई लिहिलेलं दोन पानांचं मनोगत वाचत होत्या. खणखणीत आवाज, प्रत्येक शब्दातील तळमळ त्यांच्या वाचनातून जाणवत होती. वाचन संपल्यावर मी ताईंना म्हणालो, ''ताई, तुमचं वाचन खूप प्रभावी होतंय. वाक्य बोलताना शब्दांचे चढउतार, स्वल्पविराम, पूर्णविराम, यामुळे कुठे सुधारणा करण्याची काहीच गरज नाही.'' तेव्हा ताई म्हणाल्या, ''अरे, मी शाळेत शिकत होते तेव्हा सावरकरांचं भाषण झालं होतं, नागपूरच्या चिटणीस पार्कात. आमच्या शाळेतील आम्ही मुलींनी त्यांच्या भाषणापूर्वी गीत सादर केलं होतं. गीतही सावरकरांचंच होतं. 'सकल हिंदू आम्ही बंधू' अशाच काहीतरी ओळी होत्या. गाणं संपलं आणि सावरकरांनी मला बोलावलं. विचारलं, 'काय नाव मुली तुझं?' मी सांगितलं, 'इंदू घुले'. सावरकरांनी विचारलं, 'घुलेशास्त्र्यांची कोण?' मी म्हणाले, 'मुलगी'. सावरकर म्हणाले, 'म्हणूनच तुझे उच्चार स्पष्ट आणि आवाज खणखणीत आहे.'' मग हसत ताई म्हणाल्या, ''अरे, सावरकरांनी सर्टिफिकेट दिलं आहे मला. पण बोलण्याची भीती वाटते रे बाबा. सावरकरांसमोर नाही वाटली भीती. पण इथे सर्व साहित्यिक येणारे आहेत नं, म्हणून!''

श्रद्धेय बाबा वकिलीच्या निमित्ताने वरोड्यात आले त्यावेळी त्यांचे राहणे आमच्या घराच्या अगदी मागील घरात, माझ्या काकांकडे होते. त्यातही, वरोड्यातील शिक्षण, नगरपालिका, सहकारी चळवळ


अशा सामाजिक कामांत माझे वडील व बाबा सोबत काम करत. त्यामुळे दोन्ही घरांत नेहमी परस्पर कुटुंबांची वर्दळ असायची. आमचा जन्मही झाला नव्हता तेव्हा. १९५१ मध्ये बाबा-ताईंनी आनंदवनप्रकल्पाची सुरुवात केली तेव्हा ते तेथेच राहत. संक्रात आली की ताई आनंदवनात हळदीकूंकू आयोजित करत. वरोड्यातील घरांनाही त्याचे निमंत्रण असायचे. माझी आई पण हळदीकुंकवासाठी जायची. आई एकदा ताईंना म्हणाली, 'इंदुताई, तुम्ही हळदीकुंकवाच्या निमित्तानं बोलावता, आम्ही येतो, पण एकदा तरी केव्हा वेळ मिळाला की हळदीकुंकू घ्यायला या घरी. गाव सोडल्यापासून आणि वाढत्या व्यापानं तुमचंही येणं होत नाही गावात.' तेव्हा ताई म्हणाल्या, 'मंगलाताई, माझ्यासोबत या साऱ्या जणी आहेत बघा, कुंकवाच्या ओळखीपेक्षा यांच्या कुष्ठरोगाचीच ओळख आहे सर्वांना. यांच्या भाळी जेव्हा हळदीकुंकू गावात लागेल तेव्हा मलाही हळदीकुंकू घेताना आनंद होईल.''

आनंदवनात आलेल्यांच्या आतिथ्या-बद्दल बाबांनी ताईंना सूचना देण्यास सुरुवात केली की, त्या त्यांना म्हणत- ''सूर्य असताना तुम्ही मला टॉर्च दाखवता. इथून चल, तिथून चल. अशी वाट दाखवायची गरज आहे का? कोणी आलं-गेलं की त्यांना, त्यांच्याबरोबरचे मदतनीस, ड्रायव्हर यांना जेवण दिलं की नाही असं विचारता, हा माझ्या आतिथ्यशीलतेचा अपमान आहे असं मला वाटतं.''

ज्वालेशी-फुलाचे इतके उत्कट तादात्म्य आनंदवनाने गेल्या साठवर्षांपासून अनुभवले आहे.

श्रद्धेय ताईंचे जीवन असे परिपूर्ण जीवन होते, खऱ्या अर्थाने ते कृतार्थ जीवन होते. बाबांनी स्वीकारलेल्या ध्येयावर अविचल निष्ठा ठेवून जीवनाचा प्रत्येक क्षण चैतन्यमय करणारी ती एक ध्येयस्विनी होती. त्यांनी स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्त्व ठेवलेच नव्हते. बाबांच्या वैराग्याशी, साहसाशी, विचारांशी आणि निर्भयतेशी त्या कधीच एकरूप झालेल्या होत्या. त्यांच्यातील सशक्त श्रद्धेने पुन्हा एकदा आपल्या अद्वैती निष्ठेचे दर्शन घडवले. या जगाचा आनंदाने निरोप घ्यायचा आहे, बाबांच्या सोबत श्रद्धावनात अखेरचा विसावा घ्यायचा आहे, तर अखेरच्या प्रवासासाठी बाबांप्रमाणे आपणही शनिवारीच निघायचे, तेही बाबांप्रमाणेच नऊ तारखेलाच; आणि वेळही चार वाजून त्रेपन्न मिनिटांचीच! एका कलंदर हिमालयाची सावली, आणि माऊली झालेल्या साधनाताईंनी हाही क्षण अचूक साधला होता.

**– प्रा. श्रीकांत पाटील**
राममंदिर वार्ड, वरोरा
जिल्हा चंद्रपूर-४४२९०७
दूरध्वनी क्र. ९९६०१३१४०९
lokmanya_mahavidyalaya@rediffmail.com




## तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा

**योगीराज बागूल**

''विठाबाईच्या सौंदर्याचं, नृत्याचं, संगीताचं आणि भन्नाट जीवनाचं दर्शन प्रत्ययकारी शैलीत केलं आहे. तिच्या आयुष्याची डोळ्यांत अश्रू आणणारी शोककथा वाचकांपुढे उभी केली आहे. हा विषय लेखकानं चरित्रग्रंथासाठी निवडावा आणि त्याला योग्य न्याय द्यावा हे कौतुकास्पद आहे.''

**प्रा. गंगाधर गाडगीळ**

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

# वादाचं तेल वांग्यावर

डॉ. उज्ज्वला दळवी

> बऱ्याच वेळा **GM**-अन्नासंबंधीचा त्यांचा पूर्वग्रह वैज्ञानिक विचारांवर आधारित नसतो. त्याला बैठक असते ती सामाजिक, नैतिक, धार्मिक विचारांची. त्यांना देवाच्या करणीत झालेला मानवी हस्तक्षेप पटत नाही. कल्चर्ड मोती कितीही मौल्यवान असला तरी तो त्यांच्या मते खरा मोती नसतोच. २००२ साली आफ्रिकेच्या दक्षिण भागात दुष्काळ पडला. तेव्हा पाश्चात्य जगानं देऊ केलेली GM-धान्याची मदत स्वीकारताना आफ्रिकन राष्ट्रांनी नाखुशी दाखवली ती या सामाजिक आणि नैतिक दबावांमुळेच.

''आजी, जेवायला ये. गरमगरम स्ट्यू केलाय तुझ्यासाठी.''

''का एकादशीला बाटवतेस मला? ते अभक्ष्य मी खात नाही, तुला माहीत नाही का?''

''अग आजी, त्यात रताळं, बटाटा, टोमॅटो, हिरवी मिरची आणि वऱ्यांचं पीठ इतकंच आहे. तुला उपासाला चालणारं आहे सगळं. अभक्ष्य काही नाही त्यात.''

''कसलं ते इंग्रजी नाव! गोऱ्यांचं अन्न ते! अभक्ष्य नसलं तर अभद्र असेल.''

निव्वळ अनोळखी नावाला घाबरून शेवटी आजीनं तो स्ट्यू खाल्लाच नाही.

ही नव्याची भीती नवी नाही.

अश्मयुगातले आदिमानव शिकार करत, फळं, कंदमुळं, रानबिया गोळा करत वणवणत हिंडत. त्यांपैकी काहीजणांनी रानबिया पेरायच्या ठरवल्या तेव्हाही बहुतेक शिकारी बंधूंची प्रतिक्रिया आजीसारखीच झाली असावी. तेही असंच काही म्हणाले असतील, की ''चांगल्या हातात मिळालेल्या बिया मातीत पुरणार म्हणे! मग खाणार काय? मातीतून वर येईल ते खाणार म्हणे! असलं निसर्गाविरुध्द कुणी वागतं का? देवाचा कोप होईल, आजारी पडतील, तेव्हा कळेल त्यांना!''

पण ती 'अनैसर्गिक' पेरणी चांगलीच फळली. मानवी संस्कृतीची बीजंही त्याच शेतीत रुजली. माणसानं निसर्ग बदलायचे प्रयोग चालूच ठेवले.

त्या प्रयत्नांनीच शिकारी लांडग्यांचे राखणदार कुत्रे झाले, मारक्या रानगायींच्या दुभत्या गोमाता झाल्या. सुरुवातीचं रानबियाणं बारीक, निकृष्ट होतं. त्यातून टपोरे दाणे देणारी निवडक रोपं शोधून मानवानं त्यांची नवी लागवड केली. कधी रसायनांच्या मदतीनं जनुकपालट (mutation) घडवून आणला. त्यातली खास रोपं निवडली. त्या नव्या रोपांचे पराग बोटांनी वाहून, निवडलेल्या सुदृढ जातीची शेलकी पैदास जाणीवपूर्वक वाढवली. मग त्या नव्या 'माणसाळलेल्या' जातीच जोमानं फैलावल्या. रानपिकं मागे पडली.

सूर्यफुलाचं तेल शेंगदाण्याच्या तेलाहून प्रकृतीला अधिक चांगलं असा समज आहे. नैसर्गिक सूर्यफुलं इतकी लहान होती की त्यांच्या बियांमधून जगभराच्या वापरासाठी कोटी-कोटी लिटर तेल निघालंच नसतं. माणसानं, जाणीवपूर्वक संकर घडवून सध्याची ताटाएवढी थोरली फुलं तयार केली. त्यांच्या बियांचं तेल 'नैसर्गिक' म्हणून चाललं. त्यांच्या स्पर्धेत ती नाजूकशी, नैसर्गिक सूर्यफुलं कुठे हरवली ते कुणाच्या खिजगणतीतही राहिलं नाही. तीच कथा मूळच्या गव्हातांदळाची, गुलाबाच्या फुलांची, रायवळ आंब्याची. इतकंच कशाला, कधी कधी असे संकर घडवताना चुकून उद्भवलेल्या व्यंगांचंही कौतुक केलं गेलं. पूडल किंवा शिवावा (Chihuahua) यांसारख्या कुत्र्यांच्या सदोष जाती एरवी नैसर्गिक जीवन-स्पर्धेत जगूच शकल्या नसत्या. पण माणसाने त्या जाती निव्वळ शोभेच्या 'वस्तू' म्हणून जोपासल्या.

हे संकर-प्रयत्न म्हणजे एक प्रकारचा जुगार होता. संकर-प्रयोग सफल होण्यापूर्वी अपयशाच्या बऱ्याच पायऱ्यांवर ठेचाळावं लागे. नको त्या गुणांची भर होऊन अनेक निकृष्ट जाती तयार होत. बऱ्याच रोपट्यांची नासाडी होई. शेलकेच गुणधर्म एकत्र

येण्याचा मटका कित्येक संकर केल्यावर चुकूनमाकून कधीतरी लागत असे.

या 'माणसाळलेल्या' जातींमध्ये जसे दृश्य फरक होत होते तसेच अंतर्गत बदलही होत होते. जनुकपालट (mutation) केलेल्या धान्यात तर हे बदल होतेच, शिवाय संकरित पिकांतही होते.

रानटी गव्हाच्या पेशीकेंद्रात एकूण चौदा रंगसूत्रं, म्हणजेच सात सूत्रांच्या संचांची एक जोडी (diploid) असते. त्यातल्या दुरमसारख्या भरदार जातींमध्ये रंगसूत्रांच्या दोन-दोन जोड्या (tetraploid) असतात. पुरातन काळापासून मानवानं तयार केलेल्या आणि तेव्हापासून घरोघर शिजत आलेल्या, संकरित गव्हाच्या 'नैसर्गिक' बियाण्यांत मात्र अशा तीन जोड्या (hexaploid) असतात! याचाच अर्थ हा की त्या काळातही मानवी प्रयत्नांमुळे वनस्पतींच्या बीजांत जानुकीय फेरफार घडून आले होते.

अशीच शतकं, सहस्रकं लोटली. नदीकाठच्या शेतजमिनींतून भरदार संकरित पिकं घेणाऱ्या मानवी संस्कृतीची भरभराट झाली. या वैभवकाळात लोकसंख्या वाढत गेली. तिचं पोट भरण्यासाठी अधिकाधिक जमीन शेतीसाठी वापरली गेली. त्यासाठी जंगलतोड झाली. तरी जगाची भूक भागेना. म्हणून अधिक उत्पादन देणारं बियाणं, अधिक पाट-बंधारे-कालवे, रासायनिक खतं-कीटकनाशकं असे सारे उपाय वापरून माणसानं हरितक्रांती घडवून आणली. भारतदेश, मुख्यत्वे पंजाब सस्यश्यामल झाला. IR8 या निम-बुटक्या तांदळाच्या लागवडीनं भारतातलं भाताचं एकरी उत्पादन दसपटींनी वाढलं. इतर देशांतही पीक वाढलं. मात्र मोठ्या प्रमाणात केलेल्या रासायनिक फवारणीनं पर्यावरण दूषित व्हायला लागलं. पिकावर पीक काढल्यानं उपजाऊ जमिनीचा कस धुपून गेला. तरी जगाची बकासुरी भूक मात्र वाढतच राहिली. परंतु पृथ्वीवरची जमीन कशी वाढवणार?

याच वेळी जनुकशास्त्रात नवनवे शोध लागत होते. एकोणिसशे सत्तर सालापासूनच हे अभिनव प्रयोग सुरू झाले होते. प्रयोगशाळेत, काचेच्या नळया-तबकड्यांमध्ये एका जातीच्या जनुकांचे हवे ते तुकडे वेचून, ते दुसऱ्याच जातीच्या जनुकांमध्ये गुंफून (Recombinant DNA), त्यांचं तिसऱ्याच जातीच्या जनुककोशांवर कलम करणं जमलं होतं. हे कलम म्हणजेच जनुकपरिवर्तन किंवा Genetic Modification (GM). अशा प्रयोगांमुळे उत्पन्न झालेली पिकं किंवा प्राणी हे GM Organisms आणि त्यांच्यापासून बनलेले खाद्यपदार्थ म्हणजेच GM foods.

Agrobacter हा जीवाणू मातीत वस्तीला असतो. त्याची कड्यांसारखी दिसणारी काही जनुकं (plasmids) त्याच्या मुख्य जनुककोशापासून दूर, मोकळी तरंगत असतात. विषाणूंची जनुकंदेखील अशीच विमुक्त असतात. अशी भटकी जनुकं इतर पेशींच्या केंद्रात सहज शिरू शकतात. अशा जनुकांमध्ये हव्या त्या गुणधर्मांची जनुकं ओवून ती धान्याच्या पेशींच्या जनुककोशात पोचवणं शक्य असतं. याशिवाय सोन्याच्या अतिसूक्ष्म छर्र्यांवर बसवून (biolistics) किंवा विजेच्या धक्क्यानं (electroporation) जनुकांची पेशीकेंद्रांत पाठवणी करता येते.

यापूर्वीच्या संकरपध्दतींमध्ये नेमके हवे तेच गुणधर्म नव्या पिकात उतरतील याची खात्री नसे. नव्या, genetic engineering च्या पध्दतीनं नेमके हवेत तेच गुणधर्म नव्या बियाण्याच्या पेशींत, जनुककोशात खात्रीनं पोचवता येतात. त्यामुळे बियाण्याचा, वेळाचा आणि पैशांचा अपव्यय कमी होतो.

जुन्या पध्दतीत कीड न लागण्याचा गुण तांदळाच्या एका जातीकडून तांदळाच्याच दुसऱ्या, भरदार दाणेवाल्या जातीला देण्यासाठी संकर करता येत असे. तांदळाचा बटाट्याशी संकर होणं शक्य नव्हतं. नव्या जनुकतंत्रांमुळे शेलके गुणधर्म देणारी जनुकं दुसऱ्याच वनस्पतींतून, किंवा तशी न मिळाली तर विषाणू-जीवाणू-प्राणी यांतल्या कुठल्याही जातीच्या पेशींतून वेचून हव्या त्या जातीच्या पेशीकेंद्रापर्यंत बिनचूक पोचवून देणं जमतं.

जनुक-परिवर्तित पिकांची पहिली फळी आली ती शेतकऱ्यांची दुःखं दूर करू पाहणारी.

भरीत, भरली वांगी, वांग्याचे काप, लग्नामुंजीतला वांगीभात..... भारतीय जेवणात वांग्याला फार महत्वाचं स्थान आहे. असाच एखादा फर्मास बेत ठरवून बाजारातून वांगी आणावी आणि वांग्या-वांग्यातून वेडावत कीड वळवळावी हा वैताग आणणारा अनुभव वरचेवर येतो. त्यामुळे खवैय्यांचा तर विरस होतोच, शिवाय अशा किडीमुळे शेतकऱ्यांचं नियमितपणे मोठं नुकसान होतं.

शेतकऱ्यांच्या पोटावर पाय आणणाऱ्या या किडीचं पोट पोखरणारं विष, Bt toxin, हे organic पध्दतीच्या शेतीत पिकांवर फवारलं जातं. हे विष एक विषाणूजन्य (Bacillus thuringiensis) प्रथिन आहे. ते पाण्यानं धुऊन जातं, शिजवण्याच्या उष्णतेनं नाश पावतं आणि माणसाच्या पोटातलं आम्लही त्याचा नायनाट करतं. त्यातूनही काही विष-कण निसटलेच तरी ते आकारानं मोठे असल्यामुळे आतड्याच्या वाहिन्यांत शिरू शकत नाहीत. शिवाय माणसांना या विषाचा त्रास होत नाही. म्हणूनच, ही नैसर्गिक विषाची फवारणी पर्यावरणवाद्यांनाही पसंत होती.

पण वांग्यातली बरीचशी कीड ही तक्षकासारखी वांग्याच्या आतमध्येच दडलेली असते. वरून फवारलेलं विष फक्त पृष्ठभागावर सरपटणाऱ्या किडींनाच मारू शकतं. म्हणून शास्त्रज्ञांनी हे विष तयार करणारं, Bacillus thuringiensis या जीवाणूमधलं जनुक वेगळं काढून त्याचं वांग्याच्या पेशीत रोपण केलं. त्यामुळे 'प्रत्येक घर बने किल्ला' थाटात प्रत्येक पेशी किड्यांशी लढायला विष-सज्ज झाली. किड्यांची लागण ओसरली. त्यामुळे शेतकऱ्यांचं उत्पादन वाढलं. या काळात या वांग्यातून Bt-विष पोटात जाणार म्हणून बरंच वादंग माजलं आणि त्या वादाचं तेल वांग्यावर शेकलं. Bt-वांगं बाद झालं.

कोकणी उडदामेथीतून, चमचमीत चायनीज पदार्थांतून चवीनं खाल्ला जाणारा वासोटा (tender bamboo shoots), उत्तर भारतातलं लाडकं पक्वान्न राजमा आणि कमी-अधिक प्रमाणात पावटा, चवळी यांसारखे बीन्स यांच्यातही जालीम विषं असतात. वासोट्यातलं cynide शिजवल्यावर नष्ट होतं. राजम्यातलं phythaemagglutinin खळखळ उकळत शिजवण्यानं बरंच कमी होतं पण पूर्णपणे नाहीसं होत नाही. सोयाबीन, अळंबी, मिरी, मोहरी हे तर झालेच पण अगदी आजीच्या शिवराक फराळातले बटाटे, कंदमुळं आणि हिरवी मिरचीसुध्दा बिनविषारी म्हणता येणार नाहीत. मात्र त्यांच्यात विष असतं हे पुष्कळांना माहीत नसतं. त्या अज्ञानाचा आनंद आपल्या कित्येक पिढ्यांनी चवीनं चाखला आणि पचवला आहे. बायोटेक्नॉलॉजीशी निगडित असलेल्या अधिकृत संस्थांनी ते अज्ञान दूर करून विज्ञानाची रुची सर्वसामान्य माणसांपर्यंत पोचवायला हवी. पारंपरिक अन्नातले धोके, त्यावरचे शास्त्रशुद्ध उपाय हे लोकांना कळायला हवेत. प्रसिध्दीमाध्यमांचंही ते कर्तव्य आहे. नाहीतर साप म्हणून सरसकट भुई बडवली जात राहील आणि 'नैसर्गिक' विंचू उशाखालीच राहतील.

काही इतर बाबी पूर्णपणे अनपेक्षित होत्या. Bt-वांगं शिजवून खाल्लं जाईल अशी अपेक्षा होती. पण काही आयुर्वेदिक औषधं बनवताना वांगं कच्चंच वापरलं जातं! त्यामुळे त्यासाठी जुन्या जातींची वांगी उपयोगाची ठरली.

नव्या जातीची पैदास केली म्हणजे जुन्या जाती नष्ट कराव्या हा शास्त्रज्ञांचा इरादा नव्हता. जितक्या अधिक जातींची लागवड होत राहील तितका निसर्ग अधिक समृद्ध होत जाईल. Bt सारख्या जनुकांची कार्यसिध्दीदेखील या वैविध्यावरच अवलंबून आहे.

हेच जनुक वापरून मका, कापूस, कॅनोला, सोयाबीन अशा पिकांनाही कीटकांपासून संरक्षण दिलं गेलं. ही Bt-पिकं काढताना त्याच शेताच्या २०% भागात बिगर-Bt-पीक काढून तो भाग किडींना खायला सोडून द्यावा असा नियम केला गेला. त्याने पोट भरलं की त्या तृप्त किडी Bt-पीक पचवायची नसती उठाठेव करणार नाहीत ही अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र वेगळंच घडलं. Bt-पिकाला कीड लागली नाहीच पण Btनं धास्तावलेली कीड त्या पूर्ण शेतापासून दहा हात दूर राहिली. तिथलं बिगर-Bt-पीकही न किडता अक्षत राहिलं. सोळा आणे निरोगी पीक शेतकऱ्यांच्या पदरी पडलं.

सरकीचं तेल हे खाद्यतेल म्हणून वापरलं जात असल्यामुळे कापसाची GM foods किंवा जनुक-परिवर्तित खाद्यांत गणना झाली. पण भारतात कापूस हा मुख्यत्वे धाग्यासाठी वापरला जातो. त्याच्यातल्या विषाचं जनसामान्यांना भय नव्हतं. शेतातलं दर एकरी उत्पादन वाढावं हा या प्रयोगाचा हेतू नव्हता. त्यामुळे Bt-कापसानं उत्पादन वाढलं नाही या आरोपातच तथ्य नव्हतं. आंध्रप्रदेशात २००२ साली कपाशीच्या पिकाला खोट आली खरी. पण त्या वर्षी आंध्रात दुष्काळ पडला होता. Bt-कापूस हे दुष्काळी पीक म्हणून तयार केलंच नव्हतं. त्याच्या उत्पादनाला दुष्काळाची झळ पोचली तर नवल नाही. सध्या भारतात कपाशीच्या लागवडीचा ८०% भाग Bt-कपाशीचा असतो. त्याअर्थी शेतकऱ्यांना काहीतरी फायदा झालेला असावा असं मानायला हरकत नाही.

आता या Bt-पिकांची आंतरराष्ट्रीय बाजारात खुली विक्री होते.

याखेरीज विषाणूजन्य रोगांना प्रतिकार करू शकणाऱ्या पपया, बटाटे आणि भोपळेही काही देशांच्या अंतर्गत बाजारांत विकले जातात. अशाच रोगांना प्रतिकार करणाऱ्या रताळी, मका, गहू, कॅसाव्हा अशा पोटभरीच्या पिकांचीही चाचणी-शेती चालू आहे.

नांगरणीत तणांची मुळं कापली जातात, पृष्ठभागावरची तणबीजं खोलवर ढकलली जाऊन त्यांची घुसमट केली जाते. म्हणून तणांची वाढ रोखायला नांगरणी आवश्यक असते. तणनाशकांना दाद न देणारी पिकं काढली तर तणांचा नाश होतोच, शिवाय खोलवर नांगरण्याची गरजही राहत नाही आणि श्रम वाचतात.

GM पिकांची प्रायोगिक लागवड केली तेव्हा त्याच्याबद्दल पूर्ण माहिती गोळा झाली नव्हती. अशा पिकाचे परागकण वाऱ्यानं वाहून शेजारच्या पारंपरिक शेतांत गेले तर नवी, संकरित जनुकं सगळीकडे पसरायची भीती होती. म्हणून शेतकऱ्यांना दिलेलं बियाणं प्रयत्नपूर्वक भाकड (cytoplasmic sterile males) ठेवलं होतं. शेतकऱ्यांना ते समजावून सांगितलंही होतं. साहजिकच त्याच्यापासून पैदा झालेलं बियाणं पेरून पीक येईना. नव्या पिकासाठी मूळ बियाणं नव्यानं विकत घ्यावं लागलं. या घटनेवर परावलंबित्वाचा शिक्का बसला. तिचा नको इतका गाजावाजा झाला.

अशा Round-Up Ready Canolaची प्रायोगिक बीजं बनवणाऱ्या Saskatchewanच्या शास्त्रज्ञानं ती शेतकऱ्यांना फुकटात वाटली होती. मग त्या पिकावर कॅनडात बंदी घातली गेली. त्यानंतर दहा वर्षांनी Canolaचं जे पीक कॅनडाहून युरोपला धाडलं त्या पिकातही त्या मूळ प्रायोगिक बीजांची जनुकं सापडली आहेत. ते भाकड नसलेलं बियाणं बिनबोभाट रुजत-उपजत राहिलं होतं.

जनुक-परिवर्तित अभिनव पिकांची दुसरी फळी अधिक सकस, पौष्टिक पैदाशीची.

आफ्रिका-आशियांमधल्या ११८ गरीब देशांतली अडीच ते पाच लाख मुलं 'अ' जीवनसत्वाच्या अभावामुळे आंधळी होतात. त्यांतली अर्धी त्यानंतर वर्षभरात मृत्युमुखी पडतात. या मुलांना रोजचे चार घास मिळण्याची जिथे मारामार आहे तिथे 'अ' जीवनसत्वाच्या गोळ्या कुठून परवडणार? त्यांच्या त्या चार घासांतूनच

त्यांना जीवनसत्व मिळावं म्हणून जर्मन आणि स्विस शास्त्रज्ञांनी संकरित तांदूळ बनवला. डॅफोडिल फुलाची दोन जनुकं आणि एका जीवाणूचं एक अशी तांदळाच्या जनुकांमध्ये घातली. त्यामुळे तीनशे ग्रॅम धान्यातून दिवसाभराची 'अ' जीवनसत्वाची गरज भागवणारा सोनेरी तांदूळ तयार झाला. तो गरिबांना स्वस्तात मिळावा म्हणून तो बनवणाऱ्या कंपन्यांनी त्या तांदळावरचे आपले पेटंटचे हक्क सोडून दिले. सामाजिक उद्दिष्टं गाठण्यासाठी बायोटेक्नॉलॉजीनं सुरू केलेल्या शेकडो प्रकल्पांपैकी हे एक उदाहरण आहे.

सहज पचनी पडेल असा लोहयुक्त भातही येतो आहे. अधिक प्रथिनं आणि आवश्यक नत्राम्लं भरलेल्या कॅसाव्हा, केळी आणि बटाटे यांचीही प्रायोगिक शेती चालू आहे. आफ्रिकेतल्या गरीब जनतेचं रोजचं अन्न असलेल्या कॅसाव्हामधून होऊ शकणारी सायनाईड विषाची बाधा टाळणंही जनुक-संकरामुळे जमलं आहे. गव्हाची ॲलर्जी जनुकपालटानं कमी करायचे प्रयत्न सुरू आहेत. काचऱ्या तळताना बटाट्यात तेल कमी घुसावं, कॅनोला-तेल आणि सूर्यफुलाचं तेल यांतला संपृक्त स्निग्धांश (saturated fats) कमी व्हावा, यांसाठीही शास्त्राची धडपड चालली आहे.

जानुकीय पिकांची तिसरी फळी पर्यावरणाशी जुळवून घेते.

सध्या लागवडीखालची २०% आणि शिंपली जाणारी ४०% उपजाऊ जमीन खारी होत चालली आहे. तिच्यात ॲल्युमिनियमचं प्रमाण वाढतं आहे. त्यातच पाण्याची टंचाई दिवसेदिवस वाढते आहे. तिसरं महायुध्द झालं तर ते पाण्यावरून होईल. दुष्काळाचं सावट जगाला भेवडावतं आहे. म्हणून खाऱ्या जमिनीत, कमी पाण्याचं शिंपण करूनही भरघोस पीक देणारी, सूर्याच्या ऊर्जेपासून अधिक पिष्टमय पदार्थ बनवणारी गहू-बटाटा ही पिकं सध्या प्रयोगशाळेत बनवली जात आहेत. बिनपाण्याचा जमला नाही तरी निम-पाण्याचा मका आणखी ५-६ वर्षांनी बाजारात येईल. दुष्काळातही त्याचं पीक कोळपून जाणार नाही.

पिकांची रोपं उंच वाढली की त्या उंचीसाठीच बरीच नत्र-संयुगं आणि पाणी खर्ची पडतं. जनुकसंकरानं जर पिकं बुटकी केली तर ते सारं पोषण दाणा अधिक भरदार करायला वापरलं जातं. अशा आखूडउंची-पुष्टताटी पिकांना नत्रखतांची गरज कमी लागते. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च तर वाचतोच, शिवाय पिकांना पाणी कमी लागतं आणि पर्यावरणाची हानीही कमी होते. IR8 असाच बुटका गहू. आता त्याच्या संकरित, सुधारित आवृत्त्या तयार होत आहेत.

वनस्पतींमध्येच नव्हे तर प्राण्यांवरही जानुकीय प्रयोग चालू आहेत. सामन माशाची वाढ झपाट्यानं व्हावी म्हणून त्याच्या पेशींत एका निकृष्ट जातीच्या पण सतत वाढतच रहाणाऱ्या मासळीची जनुकं घातली. वृध्दिपोषक पदार्थ उत्पन्न करणारी जनुकं वाढवून मासळी, शेळ्या-मेंढ्या यांचे आकार दुप्पट केले. पण हे सामिष खाद्य बाजारात यायला अजून बराच अवकाश आहे. वेळेला दोन-दोन अंडी घालणाऱ्या कोंबड्या, बहुप्रसवा शेळ्या-मेंढ्या, दुधात कमी साखर आणि जास्त प्रथिनं स्रवणाऱ्या गायी देखील काही प्रयोगशाळांच्या दिवास्वप्नांत दिसताहेत. दही, पाव, मद्य यांमधल्या जीवाणूंमध्येही जानुकीय सुधारणा करायचा शास्त्रज्ञांचा मनसुबा आहे. याशिवाय जीवाणूंपासून क्लोनिंगनं तयार होणाऱ्या वेगवेगळ्या मानवी किंवा इतर प्रथिनांचा खाद्यव्यवसायात केव्हाचा शिरकाव झालेला आहे.

इतके वेगवेगळे प्रयोग चालू असले तरी सध्याच्या तंत्रज्ञानाला काही मर्यादा आहेत. पेशीकेंद्रात पाठवलेलं जनुक तिथल्या जनुककोशात नेमकं कुठे पोचावं हे ठरवता येत नाही. ते चुकल्या मेंढरासारखं कुणाच्याही वळचणीला जाऊन उभं राहतं. योग्य जागेवर पोचलं तर ठीक, नाहीतर त्यामुळे गोंधळ होऊ शकतो. कधी ते जनुककोशातल्या एखाद्या अत्यावश्यक जनुकाला झाकून निकामी करून टाकतं. तर कधी एखाद्या सुप्त खलजनुकाला जागं करून, चाळवून, पिकात नको ते दुर्गुण उत्पन्न करतं.

अर्थात हा धोका जुन्या संकर-पध्दतींतही होताच. नव्या तंत्रात निदान त्या जनुकासोबत एक टेहळ्या जनुक (marker gene) जोडून ते कुठे पोचलं आहे ते शोधता येतं. त्यामुळे अनपेक्षित फेरफार होऊ न देता टिकाऊ आणि फायदेशीर बदल घडवून आणण्याची शिकस्त करता येते.

एखादं नवं औषध जेव्हा प्रयोगशाळेत तयार होतं तेव्हा ते खुल्या बाजारात येण्यापूर्वी त्याला बरेच निकष लावले जातात. बाजारात आल्यानंतरही नियंत्रक संस्थांची करडी नजर त्याच्यावरून हटत नाही. त्याचे बारीकसारीक दुष्परिणाम नोंदले जातात. मोठा धोका वाटला तर ते औषध बाद केलं जातं. या नव्या अन्नपदार्थांवरही जवळजवळ तसंच नियंत्रण असतं.

Recombinant DNAचे प्रयोग सुरू झाल्यापासून तसे तयार झालेले विषाणू पर्यावरणात निसटतील, त्यांच्यामुळे नवे रोग होतील अशी खुद्द संशोधकांनाच भीती वाटत होती. या संशोधनावर बंधनांचा अंकुश असावा असं वाटत होतं. काही काळ तर त्यांनी तेवढ्यासाठी सारे प्रयोग थांबवले. मग मद्यात घातलेलं GM खमीर (यीस्ट) खुल्या बाजारात आलं नाही. त्यावरून वाद सुरू झाला. १९९६मध्ये GM मका विक्रीला आला. वाद वाढले. मुद्दा ऐरणीवर आला. विरोधक, पर्यावरणवादी यांच्या मुलाखती अधिक प्रमाणात छापल्या गेल्या. पुढल्याच वर्षी संकरित अन्नावर लेबलिंगचा दंडक लागू झाला, पेटंट्सचीही बंधनं आली.

त्यानंतरच्या काळात वेगवेगळ्या देशांनी त्यासंबंधीचे आपापले नियम ठरवले. सात-आठ वर्षांपूर्वी WHO (आरोग्य) आणि FAO (अन्न आणि कृषी) या जागतिक संस्थांच्या वतीनं CODEX नं अन्नाच्या सुरक्षिततेसाठी मार्गदर्शिका काढली. तशीच Cartagena मार्गदर्शिका पर्यावरणाची

खबरदारी घेण्यासाठी तयार झाली.

'मूळ जनुकपरिवर्तन धोकादायक नसावं. संकरित अन्नाची पौष्टिकता आणि बाधकता पारंपरिक अन्नाच्या तशाच गुणांहून फार वेगळी नसावी. इतकं सांभाळलं तर ते संकरित अन्न खाद्य म्हणून स्वीकारण्यात धोका नाही', असा या मार्गदर्शिकांचा मुख्य रोख आहे.

हे ठरवण्यासाठी आता या नव्या अन्नाच्या अनेक चाचण्या केल्या जातात. त्याचे रासायनिक गुणधर्म, त्यातली पोषक द्रव्यं, त्याचा विषारीपणा, अपेक्षित आणि अनपेक्षित फायदे किंवा तोटे हे सारं अभ्यासलं जातं. इतकंच नव्हे, तर असे वेगवेगळे संकरित अन्नघटक एकत्र शिजवून तयार झालेले बिर्याणी, कुर्मा, पिझ्झा यांसारखे संमिश्र खाद्यपदार्थही त्यांच्या एकत्रित परिणामांसाठी तपासले जातात. जनुक-संकरित प्राण्यांमधली व्यंगं, त्यांच्या प्रकृतीतले दोष कसून शोधले जातात. निकोप, सुदृढ प्राण्यांचंच दूध किंवा मांस खाण्याला योग्य मानलं जातं.

त्यानंतर ते अन्न प्राण्यांना भरवलं जातं. उंदरांसारख्या प्राण्यांचं जीवनचक्र माणसाच्या मानानं बरंच लहान असतं. उंदरांच्या तीन-चार पिढ्यांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात नवं अन्न खाऊ घालून मानवाच्या वंशजांवर या नव्या अन्नाचे दीर्घगामी परिणाम काय होतील याचा अंदाज बांधता येतो.

नवं अन्न बाजारात येण्यापूर्वी त्याचे समाजाच्या सर्व घटकांवरचे परिणाम ध्यानात घ्यावे लागतात. गरोदर बायका, लहान मुलं, वृद्ध, रोगप्रतिकारक शक्ती क्षीण झालेले लोक, दीर्घकाळच्या आजारानं अशक्त झालेले रुग्ण, खाद्यपदार्थांची ॲलर्जी असलेले लोक या साऱ्यांचा विचार करावा लागतो. या सगळ्या बाबतीत जर नवं अन्न पारंपरिक अन्नाहून फारसं वेगळं नाही असं ठरलं तरच त्याला खाद्य म्हणून मान्यता मिळते.

या साऱ्या कसोट्यांचे निकाल आणि मूळ जानुकीय फेरफारांचे बारीकसारीक तपशील नियंत्रक संस्थांना कळवावे लागतात. या साऱ्या निकषांनंतरच ते अन्न खुल्या बाजारात येऊ शकतं. त्यानंतरही ते अन्न खाल्ल्यानं, रोज खात राहिल्यानं, जगभरात काही वावगं आढळलं तर पुन्हा सखोल अभ्यास केला जावा अशीही तरतूद आता केली जाते आहे. जसजशी शास्त्राची प्रगती होते आहे तसतशी कसोट्यांची नवनवी प्रभावी तंत्रं निघताहेत. लवकरच नव्या अन्नाची काटेकोर जनुकचाचणी उपलब्ध होईल आणि जानुकीय बदलानं होणारे सारे फेरफार आधीच तर्कशुद्ध प्रयोगांनी पडताळून पाहता येतील.

ते प्रयोग सर्वसामान्यांना समजायला कठीण आहेत. शिवाय, ते सर्वांना सांगितलेही जात नाहीत. एखादी सुगरण आपल्या खास पाककृतीतली खुबी चार जणींना सांगत नाही, नावाजलेले वैद्य आपल्या रामबाण काढ्यातल्या साऱ्या औषधींची, प्रक्रियांची नावं उघड बोलत नाहीत. त्याचप्रमाणे संशोधकांनी एखादं नवं GM खाद्य बनवताना कष्ट घेतलेले असतात, नव्या कल्पना वापरलेल्या असतात. त्यांचं पूर्ण श्रेय copy-right म्हणून त्यांच्याच ताब्यात रहायला हवं. ती सारी गुपितं FDA सारख्या नियंत्रक संस्थांना कळवावीच लागतात. पण त्या ती गुपितं फोडत नाहीत. म्हणून ती प्रक्रिया अपारदर्शक असल्याचा ओरडा होतो. खरं तर, सर्रास घेतल्या जाणाऱ्या औषधांच्या कृतीही अशाच गुप्त ठेवलेल्या असतात. टोयोटा, सुझुकी यांसारख्या जपानी गाड्यांना रंग लावायचं त्या कंपन्यांचं तंत्र असंच मुद्दाम रहस्यमय ठेवलेलं आहे. तिथे कुणी पारदर्शकतेचा आग्रह धरत नाही!

जुन्या संकरपद्धतीत प्रयोग करणाऱ्यांनाही नेमकं काय घडलं याचा पत्ता लागत नव्हता. अनपेक्षित धोकादायक परिणामांची शक्यता तिथेही होतीच. ते सारे प्रयोग प्रयोगशाळेच्या बाहेर, शेतांतच केले गेले. ज्या-त्या शेतकऱ्याखेरीज बाकी कुणापाशी त्या प्रयोगांचा गाजावाजाही झाला नाही. त्यांतला मानवी बोटं, रासायनिक पदार्थ यांचा वापर निव्वळ भोवतालच्या निसर्गाच्या सान्निध्यामुळे गौण ठरला. त्या पिकांवर 'नैसर्गिक' असा शिक्का बसला. अशा 'नैसर्गिक' पद्धतीनं बनलेलं, पारंपरिक अन्न कित्येक सहस्रकांपासून, कित्येक पिढ्यांनी खाल्लं, पचवलं आहे. ते खाताना मन निर्धास्त असतं.

नव्या जानुकीय पद्धतीतल्या प्रत्येक प्रयोगाची निदान ढोबळ माहिती उभ्या दुनियेत दवंडी पिटून सांगितली जाते. पाश्चात्य नाव ल्यालेला साधा स्ट्यू, शिवराक असूनही, खाताना आजीनं कच खाल्ली. मग त्या वऱ्यांच्या तांदळात कांद्याचं आणि बटाट्यात कुठल्याशा जीवाणूचं जनुक असल्याचं वर्तमानपत्रात वाचल्यावर तर आजीला रोजच कडकडीत उपास घडेल!

जनुक-संकरित अन्न एरवी नेहमीच्या अन्नासारखंच असतं. फक्त ते शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांमुळे आणि प्रयोगांमुळे अधिक सकस, टिकाऊ, मुबलक, स्वस्त झालेलं असतं. त्यामुळे साहजिकच जनसामान्यांचं प्रकृतिमान सुधारतं. रासायनिक फवारणी कमी झाल्यामुळे पर्यावरणाची हानी कमी होते. कीटकांना, रोगांना बळी न पडणाऱ्या पिकांमुळे शेतकऱ्यांची कमाई वाढते. टिकाऊ पिकांमुळे शेतकी-व्यवसायाला स्थैर्य लाभतं. मागासलेल्या देशांना पुरेसं अन्नधान्य मिळतं. अर्थात हे फायदे ठिकठिकाणच्या प्रादेशिक परिस्थितीनुसार कमीजास्त होतात.

या जनुक-संकरित खाद्यांत वापरलेल्या काही जनुकांचा अद्याप कधीही अन्नात समावेश केला गेला नव्हता. त्यामुळे त्यांच्यापासून मानवी आरोग्याला पोचणाऱ्या संभाव्य धोक्यांपासून सावध राहायलाच हवं. कधी त्यातली भटकी जनुकं निसटून मानवी आतड्याच्या पेशीत घुसू शकतात. कधी टेहळ्या जनुकांचा, ॲण्टिबायोटिक्सना न जुमानण्याचा उद्दामपणा आतड्यातल्या हानिकारक जंतूंना मिळून गजब होऊ शकतो. याखेरीज इतरही गोंधळ होऊ शकतात.

म्हणूनच तसं पहिलं पीक खुल्या बाजारात येण्यापूर्वीच त्याच्या परिणामांची

कसून शहानिशा केली गेली. CODEX आणि Cartagenaच्या नियमावलींमुळे या चाचणीपरीक्षांच्या पध्दतींत जागतिक एकवाक्यता आणली गेली. या मार्गदर्शिकांना अनुसरूनच वेगवेगळ्या देशांनी आपापल्या परीक्षांची स्वतंत्र पध्दत ठरवली. स्थळ-काळाच्या गरजेनुसार या पध्दतींमध्ये सतत सुधारणा केली जाते. या तपासणीत जर काही मानवी आरोग्याला किंवा पर्यावरणाला धोकादायक आढळलं तर हिरवा कंदील दाखवला जात नाही. अधिक कष्ट करून, अधिक प्रयोग करून चुकांची दुरुस्ती केली जाते. त्यानंतरच, या सगळ्या कसोट्यांतून तावून-सुलाखून निघालं की मगच GM-अन्न बाजारात विक्रीला येतं.

२००३ सालापासून अशी कसोटी-प्रक्रिया कार्यरत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात विकल्या गेलेल्या GM-अन्नापासून मानवी आरोग्याला काही धोका पोचल्याचं पुराव्यांनिशी सिध्द होऊ शकलेलं नाही.

तरीही सर्वसामान्य ग्राहकाच्या मनात GM-अन्नाविषयी कायम अढी बसलेली आहे. प्रसिध्दीमाध्यमांतून ऐकण्यात-वाचनात येणारे उलटसुलट प्रवाद आणि अधिकृत प्रवक्त्यांकडून मिळणारी तुटपुंजी माहिती या दूषित पूर्वग्रहाचा खुंटा हालवून बळकट करतात आणि त्यात GM-अन्न भरडलं जातं. 'Round-Up Ready' सारख्या पिकांमुळे जाणवलेली रासायनिक फवारणीची सक्ती कित्येकांना रुचत नाही. काहींना दर वेळेला नवं बियाणं विकत घेण्याची कल्पनाच पटत नाही.

ताटातलं अन्न शंभर टक्के बिनधोक असावं असा या ग्राहकांचा आग्रह नाही. तसा असता तर मद्यपान, धूम्रपान सोडा पण चौपाटीवरच्या सच्चा-गांडा फेरीवाल्याच्या घामानं रुचकर झालेल्या भेळपुरीवर कुणी ताव मारला नसता. नव्या जैविक तंत्रज्ञानाचंही (bio-technology) या मंडळीला वावडं नाही. मधुमेह, रक्तदाब, फ्लूचे दशावतार यांच्यावरची नव्यातली नवी औषधं घ्यायला ते आतुर असतात. काविळीची प्रतिबंधक लस जेनेटिक इंजिनीयरिंगनंच बनलेली आहे हे ठाऊक असूनही ती घ्यायला रांगा लावतात.

बऱ्याच वेळा GM-अन्नासंबंधीचा त्यांचा पूर्वग्रह वैज्ञानिक विचारांवर आधारित नसतो. त्याला बैठक असते ती सामाजिक, नैतिक, धार्मिक विचारांची. त्यांना देवाच्या करणीत झालेला मानवी हस्तक्षेप पटत नाही. कल्चर्ड मोती कितीही मौल्यवान असला तरी तो त्यांच्या मते खरा मोती नसतोच. २००२ साली आफ्रिकेच्या दक्षिण भागात दुष्काळ पडला. तेव्हा पाश्चात्य जगानं देऊ केलेली GM-धान्याची मदत स्वीकारताना आफ्रिकन राष्ट्रांनी नाखुशी दाखवली ती या सामाजिक आणि नैतिक दबावांमुळेच.

> जनुकांची भाषा ही साऱ्या जीवसृष्टीची भाषा आहे. मानवाला ती कळायला लागल्यापासून त्याच्या पापांना वाचाही त्याच भाषेत फुटायला लागली आहे. त्या भाषेतले साक्षीपुरावे कोर्टातही ग्राह्य धरले जातात. ते कसे हे आपण पुढल्या अंकात पहाणार आहोत.

नव्वद सालाच्या आसपास Mad Cow Disease, Salmonellosis यांसारख्या आजारांनी युरोपची जनता हैराण झाली होती. ह्या गंभीर आजारांची लागण रोजच्या अन्नातूनच झाली होती. त्यामुळे युरोपीय जनांच्या मनात सरसकट अन्नाबद्दल भीती निर्माण झाली होती. तिचा पगडा कमी होण्यापूर्वीच, १९९६ साली, GM-अन्न तिथल्या बाजारांत विक्रीला आलं. काही सनसनाटी बातम्या, वेगवेगळ्या कारणांसाठी झालेला विरोधी प्रचार आणि राजकारण यांनी पराचा कावळा झाला. सामान्य जनतेच्या मनातल्या भीतीचा भयगंड झाला. आत्ता आत्ता कुठे GM-धान्याला तिथे शिरकाव मिळाला आहे.

प्रादेशिक, वांशिक निकष वेगळेच असतात. पुण्याच्या आजीचा सात्त्विक, चौरस आहार एखाद्या एस्किमोला महिनाभर, अगदी पोटभर खाऊ घातला तर तो आजारी पडेल आणि एस्किमोचं एकच रीतसर जेवण व्यवस्थित जेवला तर कुठलाही तगडा भारतीय क्रिकेटर कित्येक दिवस unfit राहील. कधी उलटंही होतं. गव्हाची ॲलर्जी असलेल्या (gluten enteropathy) इंग्रजाची युरोपात किंवा उत्तर भारतात उपासमार होईल. तोच माणूस दक्षिण भारतात गेला तर उडीद-तांदूळ भरपेट खात आयुष्यभर सुखात राहील. 'One man's food is another man's poison,' 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या म्हणी खरोखरच अनुभवाच्या खाणी आहेत. नवं अन्न बाजारात आणताना आणि आणल्यानंतर देखील या साऱ्या बाबी ध्यानात ठेवल्या पाहिजेत.

सारे समज-गैरसमज दूर करून खरी वैज्ञानिक विचारसरणी समाजाला शिकवायची असेल तर अधिकृत संस्थांच्या प्रवक्त्यांनी मूलभूत माहिती सोपी करून गोरगरिबांपर्यंत पोचवली पाहिजे.

सध्या श्रीमंत राष्ट्रांना GM-अन्नाची काही गरज नाही. GM-तंत्रानं सुकर होऊ शकेल तो मागासलेल्या देशांचा भविष्यकाळ. पण तिथे सगळ्यांत मोठा अडसर आहे तो आर्थिक. GM-अन्नासाठी ठरवलेल्या ज्या अनेक काटेकोर चाचणी-परीक्षा आहेत त्या मागासलेल्या राष्ट्रांना परवडणाऱ्या नाहीत. जानुकीय संशोधन एकंदरीतच महागडं आहे. त्यामुळे अनेक गरीब राष्ट्रं अद्याप त्या फंदात पडलेली नाहीत आणि तेवढ्या काळात पाश्चात्य देशांत अनेक धान्यांवर प्रयोग केले गेले आहेत. तिथल्या शास्त्रज्ञांच्या नावानं अनेक पेटंट्स् नोंदली गेली आहेत. आता नव्यानं या शास्त्रात शिरणाऱ्याला त्या अतिरथी-महारथींच्या बौध्दिक हक्कांची पायमल्ली होऊ न देता पाऊल टाकणं अशक्य आहे आणि त्या हक्कांची किंमत चुकवणं

आवाक्याबाहेरचं आहे. स्वतः प्रयोग न करता श्रीमंत राष्ट्रांकडून GM-धान्य मिळवायचं तर त्यालाही अव्वाच्या सव्वा खर्च आहे.

भारताची परिस्थिती त्या मानानं चांगली आहे. बायोटेक्नॉलॉजी वापरून 'Mega-crop Countries' बनलेल्या जगातल्या चौदा देशांमध्ये भारत चौथ्या क्रमांकावर आहे. Bt-कपाशीनं भारतीय शेतकऱ्यांना चांगलाच नफा मिळवून दिला आहे. गेल्या वर्षी जगातल्या २९ देशांमधल्या जवळजवळ पंधरा कोटी एकर जमिनीवर GM-पिकांची लागवड झाली. यातली सर्वाधिक उपज तणनाशकाला दाद न देणाऱ्या सोयाबीनची होती. या देशांत बलाढ्य अमेरिका तर होतीच, तसेच ब्राझील, आर्जेंटिना आणि भारत हे श्रीमंत नसलेले देशही होते. युरोपीय देशांनी मात्र अजूनही GM-पिकं मनापासून स्वीकारलेली नाहीत.

जगभरातल्या भुकेल्यांच्या तोंडी नियमितपणे दोन घास पडले पाहिजेत तर सगळ्या जगानं एकजुटीनं प्रयत्न केले पाहिजेत. पुढारलेल्या देशांच्या अनुभवांच्या मजबूत पायावर मागासलेल्या देशांच्या प्रगतीची इमारत उभारता आली पाहिजे. विज्ञानासंबंधीचा अडाणीपणा, सामाजिक, धार्मिक, नैतिक अडचणी, बौद्धिक मालमत्तेवरल्या हक्कांचे अडसर, प्रगतीची वाट रोखणारा दारिद्र्याचा अडथळा या साऱ्यांतून एकसंध आंतरराष्ट्रीय प्रयत्नांनी नवे मार्ग शोधले पाहिजेत. ज्या दिवशी अशी नि:स्वार्थीपणे शिजवलेली, निगुतीनं पारखून-चाखून तपासलेली जनुकांची खिचडी खाऊन गरीब देशांतल्या सगळ्या आजी-नातवांचा उपास सुटेल त्या दिवशी बायोटेक्नॉलॉजीच्या आधुनिक विश्वामित्रांची वैज्ञानिक तपश्चर्या खरी सार्थकी लागेल.

**-डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

## शिकागो अधिवेशनात प्रसिद्ध झालेली पुस्तके





**संवादने**
**विद्या हर्डीकर-सप्रे**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**




**मनातल्या वावटळी**
**प्रगती कोळगे**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**




**तेजस्विनी**
**स्मिता भागवत**


**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**




**परक्या भूमीवर घर**
**स्मिता भागवत**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

**गजानन सबनीस** यांच्या




**'ही आपलीच माणसं'** या पुस्तकाचा **इंग्रजी अनुवाद**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

समाजाची खरी ताकद सामान्य व्यक्तीमधील असामान्यत्वामध्ये दडलेली असते. पण कुणीही व्यक्ती असामान्य म्हणून जन्माला येत नाही. तिचा चांगुलपणा, कामाबद्दलची निष्ठा आणि चांगल्या गोष्टी घडवण्यासाठीचा पुढाकार या बाबी त्या व्यक्तीला असामान्य बनवत असतात. आपल्या वैयक्तिक कोषातून बाहेर पडून काहीतरी घडवण्यासाठी पुढाकार घेणे फार महत्त्वाचे असते. हा पुढाकारच समाजावर सकारात्मक परिणाम करत असतो. महाराष्ट्रात या पद्धतीने समाजाभिमुख काम करणाऱ्या व्यक्तींचे कार्य जगासमोर यावे आणि त्यातून सकारात्मकतेचे वातावरण तयार व्हावे, ही 'थिंक महाराष्ट्र'ची धारणा आहे. त्यासाठीच 'थिंक महाराष्ट्र'ने अशा संस्था आणि व्यक्तींचे कार्य वेबपोर्टलच्या माध्यमातून जगासमोर मांडण्याचा घाट घातला आहे.

महाराष्ट्रातील सर्वत्रची अशी माहिती गोळा केली जावी, म्हणून प्रत्येक तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणी संस्कृती समन्वयक नेमण्याचे काम सुरू आहे. कोणाही वाचकाची वा त्याच्या संबंधिताची असे काम करण्याची इच्छा असेल तर त्याने संपर्क साधावा.

व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन,
३-वेणू अपार्टमेंट, केसरबाग,
बी.जे. देवरूखकर रोड,
शिंदेवाडीसमोर, दादर (पू),
मुंबई ४०००१४
इमेल: thinkm2010@gmail.com
फोन नं. : ०२२-२४१८३७१०
भ्रमणध्वनी : ९०२९५५७७६७

# कांचन सोनटक्के यांच्या कार्याचा सुवर्णांकित सृजनसोहळा

**ज्योती शेट्ये**

नृत्य-नाटचकला ज्यांच्यापर्यंत सहजपणे पोचू शकत नाही अशा मुलांना ती का शिकवू नये? दुर्बल घटक आणि अपंग मुलेसुध्दा ती कला शिकू शकतील आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत बदल घडवून त्यांचा विकास साधू शकतील... कांचन सोनटक्के यांच्या मनात हा विचार आला आणि त्यांनी तो कृतीत आणून असंख्य जीवनांत आशेची, आनंदाची किरणे आणली.

नावाने, गुणांनी आणि कर्तृत्वाने कसदार सोन्यासारख्या असणाऱ्या आणि दिसणाऱ्या कांचन सोनटक्के (पूर्वाश्रमीच्या कांचन कीर्तिकर- इथेही कीर्ती आहेच!) हे नाव त्यांनी सार्थ केले. त्या मूळच्या मुंबईकर. त्यांनी एलफिन्स्टन आणि विल्सन कॉलेजांमधून बी.एससी. पदवी प्राप्त केली. त्यांनी कथ्थक नृत्याचे धडे सीता झवेरी ह्यांच्याकडे घेतले. भरतनाट्यमचा अभ्यास रमेश पुरव व पार्वतीकुमार ह्यांच्याकडे केला. त्यांनी लोकनृत्याचा अभ्यासही केला.

कांचन सोनटक्के यांनी नाट्यकलेचा 'अमृतनाट्य भारती'चा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि तेथील गुरुवर्यांशी (कमलाकर सोनटक्के) विवाहबध्दही झाल्या. कमलाकर हे आपले स्फूर्तिस्थान आहे, असे त्या म्हणतात.

कमलाकर औरंगाबाद येथे विद्यापीठात प्राध्यापक असताना कांचन यांनी औरंगाबादमध्ये काही वर्षे 'नृत्यभारती' ही नृत्यशाळा चालवली आणि मग सोनटक्क्यांची फॅमिली मुंबईला आली, म्हणून त्या मुंबईत परतल्या. मुंबईत त्यांच्याच सेंट कोलंबा शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती परेरा ह्यांच्या आग्रहावरून त्या शाळेत, सृजनशील नाट्य (Creative Dramatics) हा विषय, अर्धवेळ शिक्षिका म्हणून शिकवू लागल्या. शाळेतील त्यांच्या वर्गात सर्वसामान्य मुलांबरोबर, कर्णबधिर मुलेही होती. तेथे त्यांनी स्वत:च्या कल्पना व क्षमता आणि मुलांचा उत्साह व उत्स्फूर्तता ह्यांचा मेळ घालत नवनवीन कलाकृती सादर केल्या.

त्या 'सेंट कोलंबा'बरोबर आणखी दोन शाळांत शिकवू लागल्या. शाळांमध्ये शिकवत असतानाच त्यांचे शिक्षण व कलाविचार विकसित झाले व त्यांनी ते कृतीत आणले. त्यातून त्यांची उपचारपध्दत आकार घेऊ लागली. पारंपरिक भारतीय नाटचकलेची मूलभूत तत्त्वे आणि पाश्चात्यकलेची आधुनिक तंत्रे ह्यांची सांगड घालून त्यांनी 'नाटचकला- एक उपचारपध्दत' ही नवीन संज्ञा जन्माला घातली. ती अपंगांच्या व्यक्तिमत्त्व-विकासासाठी व पुनर्वसनासाठी उपयुक्त ठरू लागली. त्यामुळे कांचन सोनटक्के यांचे कार्यक्षेत्र आणि ध्येय निश्चित झाले. त्यांनी अरुण व डॉ. रूपा मडकईकर ह्यांना सोबत घेऊन १९८१ मध्ये 'नाट्यशाला' ही संस्था स्थापन केली. संस्थेचे घोषवाक्य आहे-



**परिक्षित सहानी व कांचन सोनटक्के**

'व्यक्तिविकासाय कलाशिक्षा'. कला हे माध्यम असेल आणि उपचारपध्दतही असेल. मुलांच्या शालेय शिक्षणास त्याची प्रभावी जोड लाभेल व त्यास सांघिक तत्त्वाची बैठक असेल. मनोरंजनातून हसतखेळत शिक्षण होईल. अपंग मुलांचा व्यक्तिविकास साधल्यामुळे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळेल.

सोनटक्के म्हणाल्या, 'नाट्यशाले'ला जोडले गेलेले दुर्बल, अपंग, विकलांग हे मानसिक, भावनिक, बौध्दिक व शारीरिक दृष्ट्या संवेदनक्षम धडपड करू शकणाऱ्या व्यक्ती असतात. ह्या मुलांचा गट असा आहे, की त्यांच्या समस्या वेगळ्या असतात. त्यांना समजून घेऊन, त्यांच्या उर्वरित क्षमतांचा उपयोग करून घेऊन त्यांचे आत्मभान आणि आत्मविश्वास जागा करण्यासाठी त्यांना नाट्यशिक्षण द्यावे लागते.

शिक्षणातील पहिला प्रयत्न असतो तो प्रत्येक अपंग मुलाची 'स्वत:बद्दल आत्मीयता' वाढावी ह्यासाठी. स्वत:ची ओळख, मी कोण आहे व माझ्यात काय नाही ह्यापेक्षा माझ्यात काय आहे ह्याचे भान त्यांना यावे यासाठी. त्यांच्या शारीरिक आणि बौध्दिक उणिवांमुळे त्यांचा विकास कमी झालेला असतो. नृत्यनाट्य शिक्षणाने त्यांच्यात सकारात्मक बदल होऊन ते आपले अपंगत्व विसरून शारीरिक हालचाली आणि मनोविकास होण्याच्या दृष्टीने हळुहळू प्रगती करू लागतात.

अपंगांच्या बाबतीत शिकवण्याच्या मूलभूत गोष्टी म्हणजे नाट्यातून भावभावनांचे प्रकटीकरण, नृत्याद्वारे लयबध्द हालचाली, संगीतातून आवाजातील वैविध्य व लयतालाची जाणीव निर्माण करणे. सोनटक्के म्हणाल्या, की नाट्यमाध्यमाच्या सक्षमतेमुळे मुलांच्या संस्कारक्षम व शारीरिक वाढीच्या वयात बरेच काही साध्य करण्यासारखे असते. नाटक-खेळांचे साहाय्य घेऊन अपंग मुलांमधील क्षमता अजमावणे गरजेचे असते. प्रत्येकाच्या क्षमतेनुसार, प्रत्येकाच्या अपंगत्वाची वेगळी दखल घेऊन त्याप्रमाणे शिकवावे लागते; परत-परत शिकवावे लागते. प्रयत्नांत सातत्य ठेवावे लागते.

सोनटक्के प्रशांतची गोष्ट सांगतात. प्रशांत हा पाच-सहा वर्षे वयाचा असताना कार्यशाळेत दाखल झाला. तो होता बहुविकलांग, उभे राहणेही शक्य नसलेला. त्याला नृत्य-नाटय शिबिरात जो सराव दिला जात होता, त्याच्याकडून जी प्रात्यक्षिके करून घेण्यात येत होती, त्यांना प्रतिसाद देऊन, त्याने पहिले पाऊल टाकले. त्यावेळी त्याला मसाजतज्ञही उपचार करत होते. तेव्हा तज्ञांच्या असे लक्षात आले, की प्रशांतच्या सुधारणेमध्ये त्या एका आठवड्यात लक्षणीय प्रगती झाली आहे.

दुसरे उदाहरण आहे, वर्धा इथे राहणाऱ्या सागर नावाच्या मुलाचे. नृत्य-नाट्य कार्यशाळेमुळे त्याच्या आत्मविश्वासात एवढा फरक पडला की त्याने राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेऊन गाणे, वक्तृत्व आणि खेळ ह्या विभागांत बरीच बक्षिसे मिळवली.

कांचन सोनटक्के उपचारपध्दतीमध्ये नवनवीन शक्यता अजमावून पाहत प्रयोग करत राहिल्या. त्यांनी जास्तीत जास्त अपंग मुलांपर्यंत पोचण्याचे प्रयत्न केले. अपंगांमध्ये खूप वेगवेगळ्या प्रकारची मुले आढळतात; अंध, अस्थिअपंग, मतिमंद, गतिमंद, विकलांग, बहुविकलांग, कर्णबधिर वगैरे. अंधांमध्ये दृष्टिहीन, अंशत: दृष्टिहीन, रातांधळे असे अपंगत्व आढळते. अपंगांसाठी विशेष शाळांची संख्या हळुहळू वाढत आहे. आजमितीस पाचशेच्यावर अशा विशेष शाळा आहेत.

कांचन सोनटक्के यांनी अशा शाळांच्या मुख्याध्यापकांना भेटून सृजनशील नाट्य-कला व 'नाट्यशाला' ह्या प्रयोगाबद्दल चर्चा केली. अपंग मुलांसाठी शालेय वातावरणाबरोबर आणि अभ्यासक्रमाबरोबर नृत्य-नाट्य कार्यशाळेचा फायदा कसा होईल ते पटवून दिले. नाट्यकलेचे परिचयवर्ग घेतले. नाट्यकला मुलाची आकलनशक्ती, संवादकौशल्य, एकाग्रता, स्मरणशक्ती, स्नायूंच्या हालचाली-लवचीकता-लयबध्दता वाढवते हे त्यांनी नाटुकल्यांतून व प्रात्यक्षिकांतून दाखवले. शिक्षकांनीही ह्या गोष्टीचा स्वीकार केला.

सोनटक्के यांनी असे नमूद केले आहे, की नृत्य-नाट्य शिबिराने, सरावाने अपंग मुलांच्या मनात, शरीरात जे बदल घडून येतात ते प्रयत्नात सातत्य ठेवले तर कायमस्वरूपी टिकतात. त्यांच्या विकासाचा वेग वाढतो. त्यांचे भावविश्व समृध्द होते.

शिक्षकांना नृत्य-नाट्य उपचार-पध्दतीची माहिती देणे गरजेचे होते व म्हणून शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा सुरू झाल्या. त्यासाठी दिल्लीस्थित कल्चरल



कर्णबधिरांचे नृत्य

सेंटर फॉर रिसर्च अ‍ॅण्ड ट्रेनिंग ह्या संस्थेने अर्थसाहाय्य दिले. कार्यशाळेच्या अभ्यास-क्रमाच्या आखणीमध्ये अभिनय, उच्चार, वेशभूषा, रंगभूषा, दिग्दर्शन, लयबध्द हालचाली, प्रकाशयोजना, संगीत, नेपथ्य, नाटयलेखन ह्या बाबींचा अभ्यास महत्त्वाचा मानला जातो. कार्यशाळा महाराष्ट्रभर आणि भारतातल्या काही ठिकाणी झाल्या. सर्व राज्यांच्या शिक्षकांनी महाराष्ट्रात येऊन ह्या उपक्रमांत प्रशिक्षण घेतले.

'नाट्यशाले'ने पंचाहत्तर प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या आणि साडेसात हजारांवर शिक्षक प्रशिक्षित केले. कार्यशाळांत पाच हजारांच्यावर मुलांनी भाग घेतला, पण 'नाट्यशाले'ने प्रशिक्षित केलेल्या शिक्षकांकडून शिकणाऱ्या मुलांची संख्या लाखाच्या आसपास जाईल. 'नाट्यशाले'-तर्फे बालनाट्य शिबिरेही महाराष्ट्रात होतात.

सोनटक्के यांनी पुढे जाऊन विद्यार्थ्यांना व्यावसायिक कलाशिक्षण द्यायला सुरुवात केली. शारीरिक जडण-घडणीसाठी योगासने, रोप-मल्लखांब वगैरे शिकवले जाऊ लागले. ह्या शिबिरांचे नाव होते- 'रंगतरंग'. ही शिबिरे ग्रामीण भागातही यशस्वी झाली. कान्हे, वाडेश्वर, वर्धा, पाली, डहाणू येथे हे उपक्रम पार पडले.

नाटक प्रत्यक्ष सादर करण्याने मुलांच्या भावविश्वात सकारात्मक बदल घडून येतात. त्यांचा आत्मविश्वास दुणावतो. त्यांचे सर्वसाधारण मुलांसारखे रंगमंचावर वावरणे हा मुले आणि त्यांचे पालक ह्यांच्यासाठी उत्साहवर्धक अनुभव असतो. रंगमंचावरून प्रेक्षकांशी होणाऱ्या संवादाने, त्यांच्या प्रतिसादाने मुले खूष होतात. नाट्य सादरी-करण करताना बरोबरच्या सहकाऱ्यांबरोबर बंध निर्माण होतात, संघभावना वाढीस लागते. अपंगांचे एकाकीपण नाहीसे होते. प्रेक्षकांच्या टाळ्यांनी, शाबासकीने त्यांचे मन बहरून येते. स्वाभिमान वाढू लागतो, डोळ्यांत चमक येते आणि अजून काहीतरी चांगले करायची इच्छा निर्माण होते. बालप्रेक्षक प्रभावित होतात, त्यांनाही प्रेरणा मिळते.

राज्यस्तरीय आंतरशालेय बालनाट्य स्पर्धा दरवर्षी आयोजित केल्या जातात. फेब्रुवारी २०१० मध्ये ह्या स्पर्धा महाराष्ट्रभर दहा केंद्रांत घेण्यात आल्या. त्यात एकशेतीन शाळांनी भाग घेतला. अंतिम फेरीसाठी एकवीस नाटके निवडण्यात आली. अंतिम फेरी मुंबई इथे पार पडली.

'नाट्यशाले'तर्फे रंगभूमीवर स्वतंत्रपणे नाटके सादर होतात. भारतभर नाटकांचे प्रयोग होतात. आजपर्यंत पंचावन्न नाट्यकृतींचे बाराशेवर प्रयोग झाले आहेत. ह्या प्रयोगांमुळे 'नाट्यशाले'चे कार्य भारतभर पसरले आहे.

राधा कल्याणदास दटयानानी या चॅरिटेबल ट्रस्टने उभारलेल्या साईबाबा सेवाधाम ह्या वास्तूत संस्थेला जागा मिळाली आहे. पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यात कान्हे इथे ही वास्तू उभी आहे. संस्थेच्या वतीने इथे ग्रामीण प्रशिक्षण केंद्र स्थापन केले गेले आहे. 'नाट्यशाले'चा रौप्यमहोत्सव तेथे २००६ साली दिमाखात साजरा झाला.

'नाट्यशाला' स्पर्धेसाठी लिहिल्या गेलेल्या नाट्यसंहितांचे संच प्रकाशित करते. असे सात संच प्रकाशित झाले आहेत. 'गोष्ट तुमची-आमची' (इयत्ता तिसरीच्या इतिहासावर आधारित) व 'महाराष्ट्र आमुचा' (इयत्ता ३री व ४थी च्या भूगोलावर आधारित) ही दोन पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत.

कांचन यांच्या मुली -मानसी आणि मैथिली- ह्यांचे त्यांच्या कार्यात सक्रिय सहकार्य असते. नाट्यदिग्दर्शक शिवदास घोडके हेही त्यांच्याबरोबर असतात. त्यांचे कामच एवढे मोठे आहे, की 'दाते' त्यांना शोधत येतात आणि ते विपुल आहेत, म्हणून त्यांना स्वत:ला कुणाकडे याचना करावी लागली नाही हे त्या कृतज्ञतेने नमूद करतात.

त्यांना खूप मानसन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांतले 'सह्याद्री हिरकणी' पुरस्कार, 'नाट्यदर्पण' पुरस्कार, 'दलित मित्र' पुरस्कार, 'वसंत सोमण स्मृती' पुरस्कार हे काही उल्लेखनीय. पण त्यांचा खरा पुरस्कार म्हणजे, त्यांनी दिलेल्या आत्मविश्वासाच्या बळावर जीवनाची वाटचाल यशस्वीपणे करणारे त्यांचे सर्व विद्यार्थी, असे त्या मानतात. त्यांना आलेली पालकांची पत्रे आणि त्यांच्या परिवाराला जोडल्या गेलेल्या सर्व मुलांच्या वागण्या-बोलण्यातून प्रकट होणारा आदर ही त्यांच्या या पुरस्काराची पोचपावती!

कांचन माणुसकी जपणाऱ्या कलावंत आहेत. त्यांच्या सृजनाची तऱ्हा अलौकिक आहे.

**- ज्योती शेट्ये**
jyotishalaka@gmail.com
९८२०७३७३०१

**थिंक महाराष्ट्र डॉट कॉम या वेब पोर्टलवर रोजच्या रोज नवीन टिकाटिप्पणी सादर केली जाते. विविध ठिकाणांहून वाचक त्यात सहभागी होतात. अशाच काही प्रतिक्रिया सादर केल्या आहेत. आपणही अशी टिकाटिप्पणी लिहून त्यात सहभागी होऊ शकता.**

# गुगलला मराठीचे वावडे!

गुगलला मराठीचे वावडे का? हा भरत गोठोसकर यांचा 'लोकसत्ते'मधील लेख (बुधवार, २० जुलै २०११) उत्तम व विचारप्रवर्तक वाटला. त्यातील प्रतिपादनाला माझा पूर्ण पाठिंबा आहे. पण मला एक साधा प्रश्न पडतो. त्याचे उत्तर आपले आपण द्यायचे आहे. आपण एवढे मराठीप्रेमी, परंतु सर्वांना सहज वापरता येईल आणि एकमेकांशी तसाच संपर्क साधता येईल असा सर्वसामायिक मराठी फाँट का निर्माण करू शकत नाही? माझ्या या 'आपण'मध्ये मुख्यमंत्री, बाळ ठाकरे, त्यांचा मुलगा उध्दव, पुतण्या राज, आणि बाकी सर्व –प्राध्यापक, लेखक, वकील, प्रशासक येतात. यांपैकी कोणालाही आच कशी वाटत नाही? हा सर्वसामायिक फाँट वर्तमानपत्रे, विद्यापीठे, न्यायालये, सरकारी कचेऱ्या, शाळा आणि माझ्यासारखे सर्वसामान्य लोक या साऱ्यांना वापरता येऊ शकेल. त्यामुळे इमेल सहज करता येतील, लेख लिहिता येतील, प्रतिसाद देता येईल... कितीतरी सुविधा! आपल्यापैकी कोणी हे जे साधले नाही, ते 'गुगल'ने केले आहे. आपण सर्व हा मुद्दा घेऊन पुढे का जात नाही? हा मुद्दा सार्वत्रिक लागू आहे, तातडीचा आहे आणि सक्तीचादेखील होऊ शकतो.

गोठोसकर यांनी या फार महत्त्वाच्या प्रश्नाला तोंड फोडले आहे. त्यातून माहिती तर कळतेच, परंतु काही आकडेवारीदेखील उपलब्ध होते.

मराठी लोक हे इंटरनेटवरील या प्रकारच्या सेवा आणि विविध कृती यांना हवे तेवढे मोठे गिऱ्हाइक नाही, म्हणून आपली उपेक्षा होते का?

**– अशोक दातार**

datar.ashok@gmail.com

## बुद्धी खुंटली!

हा दोष 'गुगल'चा नाही. मराठी माणसाची बुध्दीच खुंटली आहे! ज्ञान–विज्ञान, कला, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण, नेतृत्व, व्यवसाय.... या कोणत्याही क्षेत्रात मराठी माणसाने गेल्या कित्येक काळात काही महत्त्वाची कामगिरीच बजावलेली नाही! गोठोसकर तसा स्पष्ट उल्लेख करत नाहीत, तथापी त्यांच्या लेखामधून तेच उघड होते – काहीसे अनपेक्षितपणे. त्यांनी अंतराळयानावर पाठवल्या गेलेल्या संदेशाचे मराठी भाषांतर दिले आहे. कोणीही ते वाचले तरी त्यातील भाषेचा हिणकस वापर, भाषेतून निर्माण झालेला अनर्थ यांबद्दल फक्त रडावेसे वाटेल! आजच्या आपल्या अवनत सांस्कृतिक अवस्थेचे द्योतक म्हणजे ते भाषांतर! मराठी माणसाकडून यापेक्षा वेगळी कसली अपेक्षा करणार? जगातल्या इतर भाषांत न्यावे या लायकीचे मराठीत काही लिहिले जात आहे का?

**– शेखर साठे**

shekharasathester@gmail.com

## थंड गोळा?

गेल्या कित्येक वर्षांत मराठी जन, भाषा, संस्कृती, समाजजीवन या कशामधेच नाव घेण्यासारखे काही घडवले गेले नाही असे शेखर साठे म्हणतात. पण प्रश्न येतो की यावर उपाय काय? आणि हे घडावे कसे?

इतिहासात डोकावून पाहिले, तर न्यायमूर्ती रानडे यांच्याबद्दल असे म्हटले गेले, की सुमारे दीडशे वर्षांपूर्वी महाराष्ट्र हा एखाद्या थंड गोळ्यासारखा निर्जीव बनून पडून राहिला होता. पण न्यायमूर्ती रानड्यांनी त्याला उष्णता देऊन पुन्हा चालना दिली.

दुर्दैवाची बाब अशी, की आजमितीला आपल्यामध्ये न्यायमूर्ती रानड्यांच्या तोलामोलाचा कुणीही नेता अस्तित्वात नाही. मग हे व्हावे कसे? याला पर्याय एक असू शकतो. तो असा, की एका हिमालयाएवढ्या मोठ्या माणसाची उणीव लहान लहान डोंगरांएवढी अनेक माणसे भरून काढू शकतील, जर ती लहान का होईना, पण आपल्या परीने विद्वान असतील आणि जर ती एकत्र येऊ शकली आणि एकदिलाने कार्य करू शकली तर!

हे प्रत्यक्षात घडवून आणण्याकरता आपल्यापाशी इण्टरनेट हे जागतिक स्वरूपाचे व अत्यंत बलशाली असे साधन उपलब्ध आहे. हा एक नवा चवाठा बनला आहे. एवंच, इण्टरनेट हा जो नवा चवाठा आपल्याला उपलब्ध झाला आहे, त्याचा उपयोग करून असा विचारविनिमय घडवून आणण्याची कल्पना दिनकर गांगल यांनी अनेक वर्षांपूर्वी मराठी विद्यापीठ या संकल्पनेद्वारे मांडली होती. प्रस्तुत थिंकमहाराष्ट्र वेबपोर्टल हे त्याचेच मूर्त स्वरूप आहे असे मी मानतो.

असा विचारविनिमय जर चवाठ्यावर घडला, तर तो इतर बुद्धिवंतांना देखील पाहता येतो आणि तेदेखील त्यामध्ये सहभागी होऊ शकतात. इतकेच नव्हे, तर असे अनेक बुद्धिवंत काय म्हणताहेत हे इतर सर्वसामान्य जनांनादेखील पाहता येते आणि त्याहून अधिक महत्त्वाचा मुद्दा असा, की सर्वसामान्यांनी सुद्धा स्वत:ला बुद्धिवंतांपेक्षा कमी लेखण्याचे कारण नाही. तेदेखील अशा चर्चेला प्रतिसाद देऊ शकतात आणि त्यांचा प्रतिसाद नक्कीच महत्त्वाचा असतो.

तेव्हा आपण सर्वांनी या 'थिंक महाराष्ट्र'चा प्रचार आणि प्रसार करायला मदत केली पाहिजे आणि जास्तीत जास्त मराठी बांधवांना या चवाठ्यावर आणायला हवे.

**– डॉ. अनिलकुमार भाटे**

anilbhate1@hotmail.com

# आदिवासी अस्मितेचा हुंकार : डॉ. विनायक तुमराम

**मदन धनकर**

डॉ. विनायक सांबा तुमराम यांची– माझी पहिली भेट ३० वर्षांपूर्वी झाली. तेव्हा ते पंचविशीत होते. त्यांचा उत्साह नव्हे संकल्प चौपदरी महामार्गावरून धावण्याचा होता. विद्यासंपादन, लेखन, सांस्कृतिक जागर व निवडणुकीत उमेदवार अशा मार्गानं मॅरेथॉन करण्याची त्यांची मानसिक सिद्धता पाहून मी हबकलो. कारण परस्परविरोधी उद्दिष्टांचा एकाच वेळी विचार करताना या युवकाचं भान राहील का, ही पहिली चिंता. यात वाट्याला येणारं यश आणि अटळपणे भूकंपासारखं हादरून टाकणारं अपयश यांचा स्वीकार ते कसा करतील, असा प्रश्न पडे. आकाश पेलताना येणारे अनुभव त्यांची केवळ कालवाकालव करून थांबणार नाहीत तर दमछाक करतील. यावेळी येणारी भोवळ निवृत्तीचं बोट धरून येते, तेव्हा विनायक तुमराम या युवकाचा निभाव कसा लागेल, असा विचार येई.

आज ३० वर्षानंतर ठेचाळत पण न पडता तुमराम यांची मॅरेथॉन सुरू आहे. यशापयशाचं संचित त्यांच्याजवळ आहे. यशानं त्यांना उमेद देऊन मार्ग प्रशस्त केला. अपयशाला ठोकर देत, घायाळ होऊन ते लढत आहेत. विद्यासंपादनात त्यांनी आकंठ प्रत्यंचा ओढून सोडलेला तीर आकाशाच्या दिशेनं झेपावला आहे. विज्ञान, कला, समाजकार्य विषयातील स्नातकोत्तर पदव्यांचे ते धनी आहेत. विधी विद्याशाखेतील पदवी पदरात पडण्याचा तेवढा अवकाश आहे. मराठी वाङ्मयात पीएच.डी. त्यांनी घेतली आहे. ज्ञानमार्गी असा लढा सुरूच आहे.



डॉ. विनायक तुमराम

अध्ययनाच्या ठिंबक सिंचनानं परिश्रमपूर्वक घेतलेलं गौरवास्पद पदव्यांचं पीक ते साठवून आहेत.

डॉ. विनायक तुमराम यांचा जन्म गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथे झाला. आरमोरी, ब्रह्मपुरी व नागपूर इथं शिक्षण पूर्ण करून ते पदार्थविज्ञान विषयात एमएस्सी झाले. भद्रावतीच्या आयुध निर्माणीमध्ये सुपरवायझर म्हणून रूजू झाले. नोकरी करून शिक्षण ही सर्वच महत्त्वाकांक्षा युवकांची धडपड असते. त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेवर लक्ष केंद्रित केलं. यशाचा दोर धरून वाटचाल सुरू झाली. तहसीलदार व साहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पदावर निवड झाली, पण रूजू झाले नाहीत. लेखाधिकारी म्हणून निवड झाल्यावर विभागीय समाज कल्याण अधिकारी म्हणून अमरावती कार्यालयात रूजू झाले. सरकारी नोकरीत सेवेचा मार्ग चिंचोळा होतो हे लक्षात आल्यामुळे मूल येथील कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात अधिव्याख्याता झाले.

मूल–सावली हे महाराष्ट्राचे दिवंगत मुख्यमंत्री कन्नमवार यांचं विधानसभा निर्वाचनक्षेत्र. तुमराम या उच्चविद्याविभूषित आदिवासी युवकासाठी ही जमीन सुपीक वाटली म्हणून राजकारणात उतरले. मागासवर्गीयांचं हित केंद्रस्थानी ठेवून राष्ट्रीय एकात्मता व सेक्युलर ही भूमिका पक्की असल्यामुळे काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून लढा दिला. मूल नगरपरिषदेत निवडणूक जिंकल्यामुळे राजकारणात उभं राहायला आधार मिळाला. दुसऱ्याच वर्षी शिक्षण समिती सभापती म्हणून निवड झाली. आपला आधार खरा असल्याचं जाणवलं. नगर परिषद राजकारणात टिकणं म्हणजे शेवाळ साचलेल्या तलावात पोहण्यासारखं आहे. अंतर कापताना हातात बळ असल्याचं जाणवतं. त्यामुळे खोलीचा अंदाज न घेताच हात पुढे सरसावतात.

विद्यासंपादनात विविध विद्याशाखांचा अभ्यास सुरू असताना सांस्कृतिक जागर चालूच राहिला. आयुध निर्माणीत (ऑर्डिनन्स फॅक्टरी) नोकरी केल्यामुळे भद्रावती तालुक्याचा जनसंपर्क वाढला. पुढे मूल तालुक्यात आल्यामुळे तालुक्याच्या खेड्यात सभा–संमेलनांच्या निमित्तानं भ्रमंती होत राहिली. यात वाचनालयं सुरू करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. दोन्ही तालुके मिळून दहा वाचनालयं सुरू झाली. चर्चा करण्याची, गाठीभेटीची दहा केंद्रं तयार

झाली. इकडे मूल येथील कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखेतील मुलांची संख्या एकदम घटली. त्यामुळे डॉ. तुमराम अतिरिक्त ठरले. पुढे त्यांना नागपूर येथील अभिनंदन कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात लगेच सामावून घेण्यात आलं. आज तेथेच ते अध्यापनाचं काम करत आहेत.

मूल नगरपरिषदेत शिक्षण सभापती झाल्यामुळे मनात ठाण मांडून बसलेलं राजकारण जागृत झालं. १९९५ साली आरमोरीत विधानसभेची निवडणूक अपक्ष उमेदवार म्हणून ते लढले. शरद पवार मुख्यमंत्री होते. काँग्रेस पक्षाची उमेदवारी मागितली. मुलाखत उत्तम झाली. आरमोरी जन्मगाव, जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव. हिंमत केली. सपशेल पराभव झाला. उमेदवाराजवळ असलेली पदव्यांची प्रमाणपत्रं मतदारांनी नाकारली. पण माघार घेतली तर तुमराम कसले! याचवेळी विद्यमान आमदार व माजी राज्यमंत्री विजय वडेट्टीवार यांनी शिवसेनेच्या उमेदवारीसाठी आग्रह धरला. सेक्युलर तुमराम यांचा नकार लक्षात घेऊन त्यांनी डॉ. रामकृष्ण मडावी यांना उमेदवारी दिली. ते निर्वाचित झाले. दहा वर्षं आमदार राहिले.

मूलच्या कामाची मात्रा आरमोरीत लागू पडली नाही. पुढे २००४ साली 'संधी आहे' असं समजून बसपाची उमेदवारी घेऊन तुमराम गडचिरोली विधानसभेसाठी उभे राहिले. गडचिरोलीदेखील अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. निवडणूक चुरशीची झाली. भाजपाचे उमेदवार विजयी झाले. तुमराम यांचा पहिला क्रमांक हुकला. मित्रमंडळ आणि पतसंस्था यांची देणी व कर्ज फेडण्यात पुढील पाच वर्षं गेली. रस्त्यावर येऊन संघर्ष करावा तर उपजीविकेची विवंचना, विचारधारा ठेवून काम करायचं तर शिक्का मारणारी टोळी मागावरच असते. पोट भरण्यासाठी नोकरी करताना संचालक-मालक आर्थिक कमाईचा ताळेबंद मांडून मोकळे होतात. बॅग धरून एखाद्या पुढाऱ्यामागे जायचं तर अगतिकतेच्या शिडीवरील पाखरू म्हणून त्यांचं लक्ष्य बनायचं अशी कार्यकर्त्यांची परवड होते. कार्यकर्त्यांची अपेक्षा नेत्यांच्या उपेक्षेचा विषय केव्हा होतो हे धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या लक्षातच येत नाही.

जातीपातीची गणितं पुढाऱ्यांनी अगोदरच सोडवलेली असतात. त्यामुळे उदाहरण सोडवताना नेत्यांना उत्तरं पाठ असतात. कार्यकर्त्यानं उत्तरांचा पाठलाग केला तर, 'उड्या मारू नका, उदाहरणाच्या उत्तरापेक्षा त्याची रीत कार्यकर्त्यांनी शिस्तीत कशी सोडवली हेच लक्षात घेतलं जातं' असं पंतोजीछाप निर्मळ उत्तर घेऊन पुढारी सज्ज असतात. डॉ. तुमराम यांनी अशी पुढाऱ्यांना पाठ असलेली उत्तरं ऐकली. राजकारणात अपघात होतात. महत्त्वाकांक्षेवर कार्यकर्ता स्वार झाला की नेत्यानं म्यान केलेलं हत्यार उपसलं जातं. त्यापूर्वी कुचंबणा नावाच्या जीवघेण्या चिखलात त्याला सतत गाडून ठेवण्यात पुढारी धन्यता मानतात.

निवडणुकीतील अपयशाचा मार झेलतानाही तुमराम यांनी लेखणी खाली ठेवली नाही. माझ्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच मला त्यांच्यातील लेखनाची ऊर्मीच सर्वात बलवत्तर दिसली. दिवंगत आमदार नारायणसिंह उईके यांच्या चरित्रलेखनाची सामग्री गोळा करण्याच्या निमित्तानं ते माझ्याकडे आले. मी नारायणसिंह यांचा विद्यार्थी असल्यामुळे संवाद उत्तम झाला. हे पुस्तक नवलेखक अनुदान योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळानं प्रकाशित केलं. प्रकाशन समारंभासाठी तत्कालीन अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे उपस्थित होते. 'गोंडवन पेटले आहे' हा तुमराम यांचा पहिला कवितासंग्रह. भावनांना सृजन पातळीवर वाट करून देताना एकीकडे त्यांनी कविता लिहिल्या तर दुसरीकडे संदर्भमूल्य असलेली चरित्रं. आज त्यांच्या नावावर दहा पुस्तकं आहेत.

आदिवासी साहित्याची सैद्धांतिक भूमिका मराठीत डॉ. तुमराम यांनी ग्रंथरूपानं मांडली. आचार्य (पीएच.डी.) पदवीसाठी त्यांनी सिद्ध केलेला प्रबंध मौलिक आहे. त्यांच्या 'आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा' ग्रंथातून आदिवासी साहित्याचं अधिष्ठान ठेवलं. त्याला संशोधनमूल्य आहे. 'कोष्टी व हलबी : शोध आणि बोध' व 'गोड गोंडबुरूड' व 'थोटी वास्तव आणि वाटचाल' ही दोन पुस्तकं वादळी ठरली. आदिवासी अस्मिता सिद्ध करताना शासकीय सवलतींच्या पार्श्वभूमीवर होत असलेले दावे-प्रतिदावे यांना या पुस्तकांनी आव्हान दिलं. एकीकडे संशोधन, दुसरीकडे वैचारिक मांडणी तर तिसरीकडे कविता, चरित्र यांची रचना असं काम करताना 'शतकातील आदिवासी कविता' हे त्यांचं संपादन मराठी वाचकांना आदिवासी कवितांचा परिचय करून देण्यास कारणीभूत ठरलं. या संपादन ग्रंथास त्यांनी लिहिलेली प्रस्तावना त्यांच्यातील सिद्ध समीक्षकांची ओळख करून देणारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र साहित्य परिषदेनं सिद्ध केलेल्या मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ७, भाग १ मध्ये आदिवासी साहित्याचा परामर्श घेण्याची संधी त्यांना मिळाली. सुमारे ७५ पृष्ठांत डॉ. तुमराम यांनी आदिवासी साहित्याची इतिहासमूल्य असलेली मांडणी केली. प्रकाशन समारंभात मुख्य संपादक प्रा. रा.ग. जाधव यांनी त्यांची पाठ थोपटली.

एवढे प्रयत्न सुरू असतानाही सांस्कृतिक जागर सुरू राहावा यासाठी डॉ. तुमराम पदरमोड करून प्रयत्नशील असतात. १० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी भद्रावतीला त्यांनी पहिल्या आदिवासी साहित्य संमेलनाचं आयोजन केलं. त्यानंतर संमेलनाचं आयोजन सुरू राहिलं. नुकतंच चंद्रपूर इथं पहिलं आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलन यांनी घेतलं. त्यासाठी आदिवासी साहित्य जागर आणि जतन संसदची स्थापना केली. गेल्या ३० वर्षांत संमेलनांचं आयोजन व आयोजित संमेलनाचं अध्यक्षपद भूषवून आदिवासी साहित्याचं स्वरूप, मांडणी व समीक्षा त्यांनी सतत केली आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये आयोजित उद्‌बोधनवर्गांना व आदिवासी साहित्यावरील राज्यस्तरीय चर्चासत्रांना मार्गदर्शक व प्रवक्ते म्हणून त्यांनी भाष्य केलं आहे.

डॉ. विनायक तुमराम यांची बिरसा मुंडा, महाराणी दुर्गावती, वीर बाबुराव शेडमाके व क्रांतीवीर नारायणसिंह उईके ही श्रद्धास्थानं आहेत. त्यांच्यातील कविमनानं ती मुक्तिनायक म्हणून सांभाळली आहेत. 'आदिवासी साहित्य स्वरूप व समीक्षा' या ग्रंथांचा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. द.भि. कुळकर्णी यांनी गौरव केला. ते म्हणतात, ''डॉ. तुमराम यांची आचार्य पदवी हौस वा फुशारकी म्हणून नव्हे, तर तिथे त्यांची ज्ञाननिष्ठा आणि समाजनिष्ठा एकरूप झाली आहे. ग्रंथात ग्रंथकारानं आदिवासी समाजजीवन, आदिवासी लोकसाहित्य, नवशिक्षित आदिवासींचं साहित्य इत्यादी विषयांचा संशोधनात्मक व समीक्षात्मक परामर्श घेतला असून प्रस्तुत ग्रंथ आदिवासी साहित्याचं मूल्यवान भूषण होय.'' या गौरवाची प्रचीती ग्रंथात येते. ग्रंथ प्रकाशन समारंभातील सत्कारानं डॉ. द.भि. कुळकर्णी भारावून गेले. ते म्हणाले, ''या सत्कारानं जीवनावरील ढासळलेला विश्वास परत मिळवून दिला आहे.''


डॉ. तुषाराम यांच्या मते, आदिवासींना धर्म आहे. त्यांना धर्माची नितांत आवश्यकता आहे. त्याशिवाय आदिवासी समाज एकसंध राहू शकत नाही. राष्ट्रभावनेला व राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाणार नाही यांची खबरदारी घेऊन धर्माची बांधणी झाली पाहिजे असं त्यांचं स्पष्ट मत आहे. अज्ञान व दारिद्र्य यामुळे झालेलं आणि होत असलेलं आदिवासींचं धर्मांतर डॉ. तुमराम यांना दुःखी करणारं आहे. आदिवासी परंपरागत धर्म व जीवनमार्ग मूल्यावर आधारित असून निसर्गाशी थेट अनुसंधान राखून असल्याचं स्पष्ट मत त्यांनी नोंदवलं आहे. हे निसर्गाश्रित वैभव सांभाळूनच देशाच्या निर्माण किंवा विकासप्रक्रियेत आदिवासींना सामावून घेता येईल असं त्यांना वाटतं.

राजकारण व राजकीय पक्षांनी आदिवासींमध्ये असलेली जातिव्यवस्था बळकट केली आहे. ज्या भागात जी जमात बहुसंख्येनं असेल त्यांना उमेदवारी देऊन वर्षानुवर्षं अनुसूचित जमातीतील विशिष्ट जमातींची मक्तेदारी सांभाळली आहे, असं डॉ. तुमराम यांचं स्पष्ट मत आहे. आदिवासी जीवनाच्या प्रेरणा त्यांच्या अस्तित्वाइतक्याच प्राचीन, पृथक व स्वयंभू आहेत असं त्यांचं मत आहे. सतत नामशेष होत चाललेल्या बोलीबद्दल व भाषांबद्दल त्यांना दुःख आहे. आदिवासींचं सांस्कृतिक वेगळेपण, संगीत, नृत्य व चित्र या ललितकलांमधून जतन करण्याची गरज आहे. आदिवासींच्या बोली आज अस्तित्वात असून त्यांची संख्या खूप आहे. त्यांचं भाषा-वैज्ञानिक पद्धतीनं संशोधन झालं पाहिजे. अशा संशोधनासाठी भारतीय व परदेशातील मान्य संशोधकांचे ग्रंथ त्यांनी संग्रही ठेवले असून, त्यांचं वाचन व चिंतन सुरू असतं.

डॉ. विनायक तुमराम यांचे काही खास अभ्यासाचे व चिंतनाचे विषय आहेत. त्यात 'आदिवासी धर्म संकल्पना', 'आदिवासींचे कायदे व न्यायनिवाडे', 'आदिवासी क्रांतिकारक', 'आदिवासींची संस्कृती' व 'आदिवासी विद्यापीठ' असे त्यातील काही विषय आहेत. कोणाच्याही भावना न दुखावता आपली स्वतंत्र वाटचाल त्यांनी सोडली नाही. आपला आग्रह दुराग्रहात रूपांतरित न करता, केवळ संशोधनातून निष्कर्ष काढण्याची त्यांची तयारी आहे. आदिवासी बोलींचं भाषाशास्त्र आणि आदिवासींचं सौंदर्यशास्त्र यांची कशी मांडणी करता येईल, याबद्दल त्यांचं चिंतन सुरू आहे.

आदिवासींच्या भिन्न जातिसमूहांवर आधारित साहित्य संमेलनं अथवा समाजसंमेलनं न करता समग्र आदिवासी समाजाचा एकत्र विचार त्यांना अभिप्रेत आहे. जातीविशिष्ट समूहांची संमेलनं श्रेष्ठ-कनिष्ठतेची आणि विलगतेची बीजं पेरतात असा त्यांचा अनुभव आहे. महाराष्ट्र शासनाचा 'आदिवासी सेवक' अथवा केंद्र सरकारचा 'उत्तम शिक्षक राष्ट्रीय पुरस्कार' यांनी त्यांचं अध्ययन बाजूला पडलं नाही. या पुरस्कारांचा नम्रपणे स्वीकार करून त्यांची वाटचाल सुरू आहे. अहंकाराची बाधा होऊ नये यासाठी फक्त ते तळमळतात.

**– मदन धनकर**
विद्यानगर,
गजानन महाराज मंदिर मार्ग,
चंद्रपूर-४२२४०१




**खेळ मांडला...**
**विभावरी दांडेकर**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

उन्मळून पडण्याचे अनेक प्रसंग आयुष्यात येऊनही, जिद्दीने 'जे. दत्त आणि कंपनी' उभी केली आणि मुलांची खेळणी बनवणारी विश्वासार्ह संस्था म्हणून नावलौकिक मिळवला ते कंपनीचे संस्थापक नाना जोशी यांचे हे अनुभवकथन.
वयाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्षीही त्यांच्यात असलेला उत्साह तरुणांना लाजवणारा आहे. कष्ट, सचोटी आणि जिद्द यांची ही कथा अनुकरणीय आणि स्फूर्तिदायक आहे.
शालेय शैक्षणिक खेळण्यांचा व्यवसाय हा सकृद्‌दर्शनी साधा वाटतो. पण त्यातले बारकावे, वैमनस्य, कष्ट इत्यादी अनेक कंगोऱ्यांनी वाचनीय झालेले हे पुस्तक 'बोलके' झालेले आहे आणि त्यामुळे ते अनेकांचा व्यक्तिमत्त्व विकास घडविणारे ठरेल हे निश्चित. कारण आपण कोणीही, कोणताही 'खेळ मांडताना' पूर्णपणे सकारात्मक व्हावे हा आदर्श हे पुस्तक देते.

## पुस्तक परिचय

### ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त उर्दू कवी

# 'शहरयार'ची कविता

### सदानंद डबीर

अलीकडेच प्रख्यात उर्दू कवी शहरयार ह्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला. त्यांच्या निवडक कवितांचे (नज्म) मराठी भाषांतर डॉ. राम पंडित ह्यांनी 'शहरयारची कविता' ह्या ग्रंथाद्वारे प्रसिद्ध केले आहे. त्या पुस्तकाचा हा परिचय.

शहरयार ह्यांना मराठी वाचन (किंबहुना श्रोता) ओळखतो, ते–
'सीने में जलन आँखों में तुफाँ सा क्यूँ है
इस शहर में हर शख्स परेशाँ सा क्यूँ है'
ह्या सुरेश वाडकरांनी गाऊन लोकप्रिय केलेल्या गझलमुळे किंवा 'उमरावजान' ह्या चित्रपटातील त्यांच्या गझलांमुळे. माझ्या 'गारुड गझलचे' (ग्रंथाली) ह्या पुस्तकात मी शहरयार यांच्या गझलांवर एक लेख लिहिला आहे. चित्रपटातील त्यांच्या लोकप्रिय गझला हा वेगळा विषय आहे. त्यांच्या अन्य गझला अतिशय चिंतनात्मक, कधी कळायला अवघड अशा 'ॲकेडेमिक' स्वरूपाच्या आहेत.


शहरयार ह्यांचा जन्म जून १९३६ मध्ये आँवला (जिल्हा बरेली, उ.प्र.) गावी झाला. शिक्षण झाल्यावर ते अलीगढ विश्वविद्यालयाच्या उर्दू विभागात व्याख्याता झाले. १९६६ ते १९९६ पर्यंत तिथेच अध्यापक, व्याख्याता, प्राध्यापक असे करत विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले. त्यांच्या 'ख्वाब का दर बंद है' ह्या संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

शहरयार ह्यांच्या गझला ऐकल्या/वाचल्या असल्या तरी त्यांच्या 'कविता' सलगपणे वाचनात आल्या नव्हत्या. त्या देवनागरीत छापलेल्या असल्या तरी उर्दू कवितांचा आशय, शब्दकोश हाताशी असल्याशिवाय पूर्णपणे कळत नाही. ही अडचण डॉ. राम पंडितांन केलेल्या शहरयार ह्यांच्या गझलांच्या अनुवादाने दूर झाली आहे.

डॉ. राम पंडितांनी उर्दू साहित्यावर पीएच.डी. केली आहे. उर्दू लिपी ते वाचू आणि लिहू शकतात. ते स्वत: मराठी/उर्दू कविता व गझला लिहितात. उर्दू-मराठी साहित्याचा तौलनिक अभ्यास त्यांनी केलेला असून त्यांचे 'उर्दू अदबपर रामायण का असर', 'उर्दू अदबपर महाभारत का असर' इत्यादी चाळीस शोधनिबंध प्रसिद्ध आहेत. मराठीतून उर्दूमध्ये उत्तम अनुवाद त्यांनी केले आहेत. त्यात कुसुमाग्रज, इंदिरा, पद्मा, शांता शेळके, सदानंद रेगे, गुरुनाथ धुरी इत्यादी कवींच्या कविता आहेत. अलीकडेच त्यांनी शंकर वैद्य ह्यांची 'हा असा पाऊस पडत असताना' त्या गाजलेल्या कविताचा उर्दू अनुवादचा केला आहे.

उर्दूतून मराठीतही त्यांनी अनुवाद केले असून, गालिबवरील मान्यवरांचे निबंध, भारतीय उर्दू कविता, पाकिस्तानी उर्दू कविता, फैज अहमद फैज, राही मासूम रजा, मीर इत्यादींचे त्यांनी केलेले अनुवाद प्रसिद्ध आहेत. हे सगळे लिहिण्याचे कारण असे, की ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त शहरयार ह्यांच्या कवितांचा अनुवाद करणारी व्यक्तीही तितक्याच तोलामोलाची अनुवादक/अभ्यासक आहे.

ह्या अनुवादित ग्रंथामध्ये डॉ. राम




पंडितांनी जे मनोगत ('दोन शब्द') लिहिले आहे तेही वाचनीय आहे. ते म्हणतात– ''शहरयारने गद्य कवितादेखील लिहिल्या आहेत. उर्दू कवींचा एक वर्ग गद्य कवितांच्या विरोधात आहे. शहरयार ह्यांच्या मते, गद्य कविता ही पद्याचीच एक विधा असून, जे छंदोबद्ध लिहू शकतात व लिहितात, त्यांनाच गद्य कविता लिहिण्याचा अधिकार आहे. जे शायरी (छंदोबद्ध) करू शकतात तेच उत्तम गद्य कविता लिहू शकतील; जी भावना, जाणीव त्यांना छंदोबद्ध करणे जमत नसेल तीच ते गद्य कवितेत मांडतील. मी थोड्या गद्य कविता लिहिल्या आहेत. पण छंदोबद्ध कविता रचताना मला जो आनंद मिळाला तो गद्य कविता लिहिताना मला मिळाला नाही.''

''जे छंदोबद्ध कविता लिहू शकत नाहीत त्यांना गद्य कविता लिहायचा अधिकार नाही-'' हे शहरयार ह्यांचे मत, मराठीने मान्य केल्यास, सुमार कवितांची जी बेसुमार वाढ मराठीत फोफावली आहे त्याला आळा बसू शकेल... पण हे होण्याची शक्यता दिसत नाही.

अनुवादकाचे काम नेहमीच अवघड असते. 'अनुवाद सुंदर असेल तर प्रामाणिक नसतो आणि प्रामाणिक असेल तर सुंदर असण्याची शक्यता कमी!' - असे म्हटले जाते. त्यातही कवितेचा अनुवाद सर्वांत अवघड गोष्ट आहे. कारण भाषा बदलली की संस्कृतीही थोड्या प्रमाणात बदलते; प्रत्येक भाषेची एक 'संस्कृती' असते. जी गोष्ट उर्दूत चांगली वाटेल ती मराठी तितकीशी रुचणार नाही, असेही कधी घडू शकते. अशा वेळी 'भावानुवादा'चा आश्रय घ्यावा लागतो. कवितेतल्या शब्दांना, केवळ आशयाने सौंदर्य येते असे नाही, तर प्रत्येक शब्दाचा नाद आणि लय कवितेला सौंदर्य देत असते. कविता गद्य असली तरीही, कवितेची लय, शब्दांचे नाद विशिष्ट असतात. कवितेतल्या शब्दांचा क्रम सहजासहजी बदलता येत नाही, तसे केल्यास सौंदर्यहानी होते. म्हणूनच 'कवितेचा अनुवाद' हे जोखमीचे काम आहे!

डॉ. राम पंडितांनी हे अनुवादाचे कार्य अतिशय कौशल्याने पार पाडले आहे. अन्य भाषेतल्या सगळ्याच 'चांगल्या' कविता - अनुवादासाठी 'योग्य' असतात असे नाही, त्यामुळे डॉ. राम पंडितांनी इथे निवडकच कविता घेतल्या आहेत. अर्थात त्यांची संख्या थोडीथोडकी नाही तर तब्बल दीडशेच्या घरात आहे.

डॉ. पंडितांच्या चपखल अनुवाद-कौशल्याचे एक उदाहरण देतो.

'मेरी गर्म साँसों की सरगम को सुनकर
हवा झुम उठी' - शहरयार

आता 'झुम उठी'चा मराठी अनुवाद अवघड आहे. 'झूमना' म्हणजे 'नाचणे' नाही. 'हवा नाचू लागली' असे म्हणता येणार नाही. मग मराठीत आशयाच्या जवळ जाणारा शब्द 'डोलणे' होऊ शकतो. डॉ. पंडितांचा अनुवाद असा-

'माझ्या उबदार श्वासांची सरगम ऐकून
हवा डोलू लागली'

'गर्म सांस'चा अनुवाद 'उष्ण श्वास' असा करायचा मोह होईल. पण तो टाळून 'उबदार' हा शब्द सुचेपर्यंत - 'पेशन्स' राखणे ही अनुवादकाची तपश्चर्या असते.

हा अनुवाद वाचताना आपण मूळ मराठीच कविता वाचत आहोत असा भास व्हावा, इतका हा अनुवाद छान जमून आला आहे. मराठी वाचक/श्रोते/रसिकांना, शहरयार ह्या ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कवींच्या एका अनोळखी पैलूचा परिचय डॉ. राम पंडितांनी करून दिला आहे. त्यांना मन:पूर्वक दाद द्यायलाच हवी. हे कार्य 'काबिले तारीफ' असेच आहे. अधिक काही न लिहिता, शहरयार ह्यांच्या काही उर्दू कविता व त्यांचा डॉ. पंडितकृत अनुवाद पाहूया.

**छपते छपते**

सदा
जो इस जहाँ को लगा रही थी नींद से
सुकून की सलीब को सलाम कर के सो गई
मगर किसी ने इस खबर को गौर से पढा नहीं

**छापता-छापता**

हाक
जी निजेतून एका जगाला जागं करत होती
ती नि:स्तब्धतेच्या वधस्तंभाला सलाम करून झोपी गेली
पण कोणीच ही बातमी ध्यान देऊन वाचली नाही

**एक अधुरी ख्वाइश**

ये खंजर लो और वार करो
और मेरे सौ टुकडे कर दो
फिर छलनी जिस्म को सहलाओ
आँखो की ओस में नहलाओ
तुम मेरे कातिल कहलाओ
उस दिन के लिए मैं जिन्दा हूँ

**एक अपूर्ण इच्छा**

ही कट्यार घे अन् वार कर
माझे शंभर तुकडे कर
मग चाळणी झालेल्या शरीराला गोंजार
डोळ्यांतील आसवांनी न्हाऊ घाल
तू माझा खुनी म्हणवून घे
त्याच दिवसासाठी मी जिवंत आहे


**हैरान करनेवाली इक बात**

डूबती श्याम के उस पार
खडे थे जो लोग
हमने इन आँखोंसे देखा है
की उन लोगोंकी
मुठ्ठियाँ बंद थी
ये रेत कहाँसे आयी?

**अचंबित करणारी गोष्ट**

डुबणाऱ्या सांजेच्या त्या तीरावर
उभे होते जे लोक
आम्ही या डोळ्यांनी पाहिलं की
त्या लोकांच्या
मुठी बंद होत्या
ही रेती कुठून आली?

**- सदानंद डबीर**
१ बी/२०६ विमानदर्शन,
जीवा महाले मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९
दूरध्वनी : २६८४८३९९




**गारुड गझलचे -** सदानंद डबीर

**मूल्य १२० रुपये । सवलतीत ७५ रुपये**

# लिओ टॉलस्टॉय : लेखक, माणूस आणि तत्त्वचिंतक

**सतीश खांबेटे**

एकोणिसाव्या शतकात ज्यांनी रशियन साहित्य समृद्ध करण्याचे काम केले, त्यामध्ये लिओ टॉलस्टॉय हा आघाडीचा साहित्यिक म्हणावा लागेल. रशियन भाषेतील उच्चारानुसार टॉलस्टॉयचे संपूर्ण नाव ल्येव निकलयविच तल्स्तोय असे लिहिले जाते. परंतु प्रस्तुत लेखात त्याचा उल्लेख सोयीसाठी पाश्चिमात्य जगाला परिचित असल्यानुसार लिओ टॉलस्टॉय असाच केला आहे. टॉलस्टॉय या व्यक्तीचे विश्लेषण करायचे झाल्यास लेखक टॉलस्टॉय, माणूस टॉलस्टॉय आणि तत्त्वचिंतक टॉलस्टॉय अशा तिहेरी अंगांनी करावे लागेल. वॉर अँड पीस, ॲना करेनिना, रिसरक्षन आदी कादंबऱ्या, शेकडो लघुकथा, फारमोठा पत्रसंग्रह, टीकात्मक लेख असा टॉलस्टॉयचा फारमोठा साहित्य साठा आहे. टॉलस्टॉयचा साहित्य प्रपंच म्हणजे जणू एकोणिसाव्या शतकातील रशियन समाजजीवनाचा माहितीकोषच आहे असे म्हणावे लागेल. एक साहित्यिक म्हणून टॉलस्टॉय केवळ रशियातच नव्हे तर संपूर्ण युरोपातही अतिशय लोकप्रिय होता. रशियातील त्याचे समकालीन लेखक तर त्याच्या प्रेमातच पडले होते. टॉलस्टॉयचा जन्म ९ सप्टेंबर १८२८ रोजी झाला होता. त्याला उतारवयात म्हणजेच २८ जानेवारी १९०० रोजी प्रसिद्ध रशियन लेखक आंतोन चेखॉव याने टॉलस्टॉयबद्दल म्हटले, ''लिओ टॉलस्टॉय हा एके दिवशी मरण पावणार या विचारानेच मला कसेसे वाटते. दुर्दैवाने तो मरण पावला तर माझ्या जीवनात एक प्रचंड पोकळी निर्माण होईल. पहिले म्हणजे त्याच्याइतके प्रेम मी दुसऱ्या कुणावरच केलेले नाही. दुसरे म्हणजे तुम्ही टॉलस्टॉय वाचत असता तेव्हा तुमच्यातला लेखक फुलत असतो. तिसरे म्हणजे टॉलस्टॉय हा घट्ट पाय रोवून उभा असतो. त्याच्याशिवाय साहित्यिकांचा गट हा मेंढपाळ नसलेल्या मेंढ्यांप्रमाणे असतो.'' आंतोन चेखॉनचे हे मत म्हणजे टॉलस्टॉय हा किती उंचीचा साहित्यिक होता ते दर्शवणारे आहे.

मॉस्कोपासून सुमारे ८० कि.मी. अंतरावर 'यास्नया पल्याना' येथे टॉलस्टॉयची भलीमोठी वडिलोपार्जित इस्टेट आणि घर आहे. त्याचे रूपांतर स्मारकवजा म्युझियममध्ये करण्यात आले आहे. मला स्वत:ला 'यास्नया पल्याना' येथे जाण्याचे भाग्य १९८१-८२ च्या मॉस्को येथील वास्तव्यात लाभले. उमराव घराण्यात जन्मलेला लिओ अवघा दोन वर्षांचा असताना त्याची आई वारली, तर वयाच्या नवव्या वर्षी त्याचे वडीलही निवर्तले. यानंतर लिओ व त्याची चार भावंडे यांचा सांभाळ त्यांची आजी व आत्या यांनी केला. लिओ यांची जडणघडण इतर उमराव घराण्यातील मुलांप्रमाणेच झाली. त्याला शिकवण्यासाठी खाजगी शिक्षक घरीच येत असत. त्याला फ्रेंच आणि जर्मन भाषांचे शिक्षणही देण्यात आले होते.

एक माणूस म्हणून टॉलस्टॉयच्या जीवनातील घडामोडी पहायच्या तर त्यात काही मनोरंजनात्मक प्रकार पहायला मिळतील. सुरुवातीस वयाच्या तेविसाव्या वर्षीच विवाह करून यास्नया पल्याना इथे वैवाहिक जीवनास प्रारंभ करायची तिला इच्छा झाली होती. परंतु प्रत्यक्षात त्याचा विवाह होण्याला ३४ वे वर्ष उजाडावे लागले. सोफिया आंद्रेयेवना ही पत्नी बनून त्याच्या जीवनात आली. ती राजवैद्याची मुलगी होती. आपल्या जीवनसाथीला विश्वासात घेऊन आपल्या आयुष्यातील घटना सांगाव्यात या उद्देशाने टॉलस्टॉय याने आपल्या डायऱ्या सोफियाला वाचायला दिल्या. यामागची टॉलस्टॉयची मनोभूमिका स्तुत्य असली तरी त्यामुळे झाले भलतेच. कारण या डायऱ्यांमध्ये यास्नया पल्याना येथील एका शेतमजूर स्त्रीला टॉलस्टॉयपासून अनौरस मूल झाल्याचा तसेच त्याच्या इतर प्रकरणांचा उल्लेख होता. यामुळे सोफिया लिओला नेहमी संशयाच्याच नजरेने पाहू लागली, परंतु असे जरी असले तरी या विवाहामुळे टॉलस्टॉयच्या साहित्यनिर्मितीवर चांगला परिणाम झाला. सोफिया ही लिओची लेखनिक व सचिव बनली.

लिओ आणि सोफिया यांचा विवाह कसा झाला याची पार्श्वभूमीही मनोरंजक आहे. टॉलस्टॉय यांचे सोफियाचे वडील डॉक्टर बेर्स यांच्याकडे नियमित जाणेयेणे असे. बेर्स यांना तीन मुली होत्या. सर्वांत मोठी लिझा, मधली सोफिया आणि धाकटी तत्याना. यापैकी खरेतर सोफिया ही रूपाने आणि बुद्धीनेही सुमार होती पण लिओ हा सुरुवातीस लिझाकडे आकर्षित झाला. पुढे जेव्हा लिझाला असे दिसून आले की टॉलस्टॉय हा आपल्यापेक्षा सोफियाकडे अधिक प्रमाणात आकृष्ट होत आहे, तेव्हा

तिने एकच थयथयाट केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही आणि सोफिया ही वधू बनून टॉलस्टॉयच्या जीवनात आली. सोफिया आणि लिओ टॉलस्टॉय यांना एकूण १३ मुले झाली.


आपल्या आयुष्याच्या उतारवयात कुटुंबातील व्यक्तींच्या एकामागोमाग झालेल्या मृत्यूमुळे लिओ याने एकदम व्यथित होऊन धर्माचा आश्रय घेतला. सुरुवातीस रशियन ऑर्थोडॉक्स चर्चची शिकवण आणि कर्मकांड यांचा टॉलस्टॉयने स्वीकार केला. पण लवकरच त्याला त्यात फोलपण वाटू लागला व तो चर्चच्या शिकवणुकीवर टीका करू लागला. त्याने स्वत:चे धार्मिक विचार तयार केले. टॉलस्टॉय याच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे त्यांच्या उतारवयात महात्मा गांधी यांच्याशी पत्रव्यवहाराद्वारे आलेला त्याचा संबंध. महात्मा गांधी हे दक्षिण आफ्रिकेत असताना त्यांनी ट्रान्सवाल येथे 'टॉलस्टॉय फार्म' नावाचा आश्रम सुरू केला होता. टॉलस्टॉय याला गांधीजींनी लंडन मुक्कामी असताना ट्रान्सवल येथील भारतीयांच्या परिस्थितीची माहिती देणारे पत्र लिहिले होते. या पत्राला टॉलस्टॉयने 'यास्नया पल्याना' येथून ७ ऑक्टोबर १९०९ रोजी उत्तर लिहिले. त्यात टॉलस्टॉय म्हणतो, ''नुकतेच आपले सुरेख पत्र मिळाले. वाचून आनंद झाला. ट्रान्सवालमधील आपले बंधुजन आणि सहकारी यांना ईश्वर मदत करो. कोमल विरुद्ध कठोर, तसेच नम्रता व प्रेम विरुद्ध गर्व व हिंसा यांच्या दरम्यानचा हा संघर्ष आहे. तो आता आमच्याकडेही सक्तीच्या लष्करी सेवेस होणाऱ्या विरोधाद्वारे जाणवू लागला आहे.''

टॉलस्टॉयच्या या पत्राला गांधीजींनी प्रत्युत्तर दिले. त्याबाबत लिहिताना टॉलस्टॉय म्हणतो, ''आपले पत्र आणि त्याबरोबर पाठवलेले 'इंडियन होमरूल' हे पुस्तक मिळाले. मी ते अत्यंत मन:पूर्वक वाचले. आपले विचार हे फक्त भारतीयांसाठीच नाही तर संपूर्ण मानवजातीसाठी लागू होतात असे मला वाटते. त्यांचा मी आदर करतो.''

टॉलस्टॉय याने गांधीजींना अखेरचे पत्र लिहिले ते ७ सप्टेंबर १९१० रोजी. हे पत्र चांगलेच लांबलचक होते. त्यात टॉलस्टॉय म्हणतो, ''मी आता मृत्यूच्या जवळपास येत आहे. प्रेम हा मानवी मनाचा सर्वोच्च कायदा आहे. तो प्रत्येकाच्या मनात खोलवर स्थान धारण करून बसलेला असतो भारतीय, चिनी, हिब्रू, ग्रीक तसेच रोमन अशा प्रकारच्या सर्व तत्त्वचिंतकांनी प्रेमाच्या नियमाचाच पुरस्कार केलेला आहे. पण माझ्या मते येशू ख्रिस्ताने तो सर्वांत प्रभावीपणे मांडला आहे. आपल्याला सांगायला आनंद होतो की आपल्या ट्रान्सवालमधील चळवळीप्रमाणेच रशियातही लष्करीकरणाविरोधी चळवळ आता चांगलेच मूळ धरू लागली आहे. ब्रिटिश सरकारप्रमाणेच आता रशियन सरकारही शांतता चळवळीचे महत्त्व जाणू लागले आहे. येशू ख्रिस्ताने प्रेम व अहिंसा यांचाच कायम पुरस्कार केला असला तरी सर्व ख्रिस्ती समाज याच तत्त्वांना चिकटून बसला आहे असे नाही. हा त्यांच्या जीवनातील विरोधाभास आहे.'' गांधीजींना हे पत्र पाठवल्यानंतर काही दिवसातच टॉलस्टॉय कालवश झाला. अशा प्रकारे टॉलस्टॉयचे वर्णन एक भारतमित्र म्हणून केल्यास ते वावगे ठरू नये.

**– सतीश खांबेटे**
बी/२, गणेशकृपा सोसायटी,
लक्ष्मण म्हात्रे रोड, दहिसर (पश्चिम)
फोन : २८९३१८२३

**ग्रंथालीचे नुकतेच प्रसिद्ध झालेले पुस्तक**




**वसुमती धुरू** लिखित

**माझ्या मनाचा मुरांबा**

**(आंबटगोड आठवणी)**

**हे लेखन म्हणजे ब्याऐंशी वर्षांच्या दीर्घ जीवनातील आठवणींचा आंबटगोड मुरांबा आहे. डाएटिशियन म्हणून काम करताना आणि एक गृहिणी व रसिक म्हणून अनुभवलेले जीवनातील प्रसंग इथे रसाळ शैलीत उतरले आहेत. हे सलग आत्मचरित्र नाही, हा आहे आठवणींचा गोफ, वाचकाला सोबत नेणारा...**


**मूल्य २७५ रु. सवलतीत १६० रु.**

RNI NO - 428 / 1987
RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011 POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001


# शिकागो अधिवेशनात प्रसिद्ध झालेली पुस्तके




**तेजस्विनी**
स्मिता भागवत




**परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत



**मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे




**संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे



बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो येथील अधिवेशनात प्रगती कोळगे यांच्या 'मनातल्या वावटळी' या पुस्तकाचे प्रकाशन रत्नाकर मतकरी यांच्या हस्ते झाले.



याच अधिवेशनात विद्या हर्डीकर-सप्रे यांच्या 'संवादने' या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन ग्रंथालीच्या स्टॉलवर झाले त्यावेळी वसंत खैरनार, सुधाकर राऊत, शरद देशपांडे, लेखिका विद्या हर्डीकर-सप्रे, प्रगती कोळगे आणि सुदेश हिंगलासपूरकर

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.